गुरुवार, १८ ऑगस्ट २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ३२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

टीईटी घोटाळ्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना पुन्हा नो एण्ट्री/२
नियम पाळून दहीहंडी साजरी करा; पोलिसांचे आवाहन/३
भारत-झिम्बाब्वे आज पहिला वनडे सामना/८

## समूह राष्ट्रगीत गायनाला राज्यभरातून उत्तम प्रतिसाद



**मुंबई** : स्वराज्य महोत्सव उपक्रमांतर्गत बुधवारी (दि. १७) राज्यभर समूह राष्ट्रगीत गायन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांसह नागरिकांनी सहभाग घेत उत्तम प्रतिसाद दिला. भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने देशभरात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. याच अनुषंगाने राज्यात ९ ते १७ ऑगस्टदरम्यान सांस्कृतिक कार्य विभागामार्फत स्वराज्य महोत्सव आयोजित करण्यात आला. या महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी बुधवारी सकाळी ११ वाजता समूह राष्ट्रगीत गायनाचे आयोजन राज्यभर करण्यात आले होते. समूह राष्ट्रगीत गायनानंतर वंदे मातरम् आणि भारतमाता की जय या घोषणा देण्यात आल्या. त्यामुळे वातावरण देशभक्तीमय झाले होते.

# मोदी सरकारचे ‘जय किसान’! अल्प मुदतीच्या कर्जावरील व्याजात दीड टक्के सूट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मोदी सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. मंत्रिमंडळाच्या बुधवारी (दि. १७) झालेल्या बैठकीत तीन लाख रुपयांपर्यंतच्या अल्प मुदतीच्या कृषी कर्जावर दीड टक्के सूट देण्यात येत असल्याची माहिती केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी दिली. या योजनेंतर्गत २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत ३४ हजार ८५६ कोटी रुपयांची अतिरिक्त अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असल्याचेही त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.



शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रात पुरेशी कर्ज मिळू शकणार आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासोबतच क्रेडिट लाइन हमी योजनेच्या निधीतही वाढ करण्यास सरकारने मान्यता दिली आहे. सरकारच्या या पावलामुळे कृषी क्षेत्राला चालना मिळणार आहे. केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी यापूर्वीच सांगितले होते की, सरकार कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देत आहे. त्यामुळे खेड्यापाड्यातील सुशिक्षित तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. त्या दृष्टीने आज निर्णय घेण्यात आला, असे मंत्री ठाकूर म्हणाले.

केंद्र सरकारने कृषी क्षेत्राला पूर्ण पाठिंबा देण्यासाठी अनेक योजना सुरू केल्या असून राज्यांच्या सहकार्याने हे काम प्रगतिपथावर आहे. शाश्वत उपाय शोधून शेतकऱ्यांना समृद्ध आणि शेतीचे आधुनिकीकरण कसे करता येईल यावर भर दिला जात आहे.



# विनायक मेटेंच्या मृत्यूची होणार सीआयडी चौकशी

## मुख्यमंत्र्यांचे आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसंग्राम संघटनेचे प्रमुख विनायक मेटे यांच्या अपघाती मृत्यूची राज्य सरकारकडून गंभीर दखल घेण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत पोलीस महासंचालकांना सीआयडी चौकशीचे आदेश दिले आहेत.

माजी आमदार विनायक मेटे यांच्या कारला १४ ऑगस्ट रोजी मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अपघात झाला होता. या अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हा घातपात तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे यांनी अपघाताच्या त्या दोन तासांत काय झाले याची चौकशी केली पाहिजे, अशी मागणी केली होती. अशातच सोशल मीडियावर एक ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहे. या क्लिपमधील आवाज विनायक मेटेंच्या अपघातापूर्वी त्यांच्यासोबत असलेले आणि त्यांचे निकटवर्तीय अण्णासाहेब मायकर यांचा असल्याचा दावा केला जात आहे.

दरम्यान, विनायक मेटे यांचे भाचे बाळासाहेब चव्हाण यांनी मेटेंच्या वाहनचालकावर संशय घेत त्याची चौकशी



करण्याची मागणी केली आहे. मेटे यांचा चालक सध्या पोलिसांच्या ताब्यात आहे. तो वेगवेगळा जबाब देतोय, असा आरोप चव्हाण यांनी केला आहे.

विनायक मेटे यांच्या अपघातानंतर मुख्यमंत्री शिंदे तातडीने एमजीएम रुग्णालयात गेले होते. त्या वेळीच प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी या मृत्यूची सखोल चौकशी करण्यात येईल, असे जाहीर केले होते. त्यानुसार बुधवारी (दि. १७) त्यांनी राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांना या मृत्यूची सीआयडी चौकशी करून आपला निष्कर्ष सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

## एमपीएससी, बीएड सीईटी परीक्षार्थींना दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

एमपीएससी आणि बीएड सीईटी परीक्षा २१ ऑगस्ट रोजी एकाच दिवशी होणार असून दोन्ही परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षांसाठी बॅच बदलण्याचा पर्याय देणार येणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी निवेदनाद्वारे विधान परिषदेत व विधानसभेत केले. त्यामुळे या परीक्षार्थींना दिलासा मिळाला आहे.

सीईटी कक्षामार्फत बीएड व बीएचमसीटी या दोन विषयाची परीक्षा २१ ऑगस्ट रोजी होणार असून जे उमेदवार या परीक्षांबरोबरच एमपीएससी परीक्षेस बसलेले असतील त्यांनी याबाबत त्वरित सीईटी कक्षास ई-मेलद्वारे कळवावे, जेणेकरून त्यांना सीईटीमार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी बॅच बदलून देण्याची कार्यवाही करता येईल. या उमेदवारांनी maharashtra.cetcellgmail.com या ई-मेलवर पत्रव्यवहार करावा, असेही मंत्री पाटील यांनी सांगितले.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना भाजपकडून मोठी जबाबदारी

### केंद्रीय निवडणूक समितीत स्थान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पक्षाचा आदेश शिरसावंद्य मानून राज्यात उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतलेल्या देवेंद्र फडणवीस यांना पक्षनिष्ठेचे फळ मिळाले आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांना आता केंद्रात स्थान मिळाले आहे. भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीची बुधवारी (दि. १७) घोषणा झाली. यात महाराष्ट्रातून फडणवीस यांना सदस्य म्हणून स्थान देण्यात आले आहे.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची घोषणा केली. या समितीमध्ये देशभरातील भाजपच्या १५ बड्या नेत्यांच्या समावेश करण्यात आला आहे. समितीच्या अध्यक्षपदी नड्डा आहेत. सचिवपदी बीएल संतोष, तर सदस्य म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, बीएस येडीयुरप्पा, सर्वानंद



सोनोवाल, के. लक्ष्मण, इकबाल सिंह लालपुरा, सुधा यादव, सत्यनारायण जटिया, भूपेंद्र यादव, देवेंद्र फडणवीस, ओम माथूर, वनथी श्रीनिवास यांचा समावेश आहे.

दरम्यान, भाजपच्या संसदीय समितीचीही बुधवारी घोषणा करण्यात आली. यात पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा अध्यक्षपदी, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, बीएस येडीयुरप्पा, सर्वानंद सोनोवाल, के. लक्ष्मण, इकबाल सिंह लालपुरा, सुधा यादव, सत्यनारायण जटिया सदस्यपदी, तर बीएल संतोष सचिवपदी असणार आहेत.

## राष्ट्रपती, उपराष्ट्रपतींच्या अभिनंदनाचा प्रस्ताव

**मुंबई** : द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपतीपदी आणि जगदीप धनखड यांची उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. भारताने नेहमीच महिला सबलीकरणासाठी पहिले पाऊल टाकून जगासमोर आदर्श ठेवला आहे. याच परंपरेचा गौरव व अभिमान म्हणून राष्ट्रपतीपदी मुर्मू यांची निवड ओळखली जाईल, तर धनखड यांच्या रूपात संसदीय कामकाजाचा दांडगा अनुभव असलेल्या संसदपटूची भारताच्या उपराष्ट्रपतीपदी निवड झाली आहे. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या धनखड यांनी पुढे कायद्याची पदवी प्राप्त केली. याचा मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी उल्लेख केला.

## विधान परिषद सभागृह नेतेपदी देवेंद्र फडणवीस

**मुंबई** : विधान परिषद सभागृह नेतेपदी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा विधान परिषद सभागृहात परिचय करून देण्यात आला. दानवे यांच्या नियुक्तीला यापूर्वी काँग्रेसने विरोध दर्शविला होता. याशिवाय नवनिर्वाचित विधान परिषद सदस्यांचा परिचय उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहाला करून दिला. यामध्ये रामराजे नाईक-निंबाळकर, एकनाथ खडसे, प्रवीण दरेकर, सचिन अहिर, प्रा. राम शिंदे, भाई जगताप, प्रसाद लाड, आमशा पाडवी, श्रीकांत भारतीय, उमा खापरे या सदस्यांचा समावेश आहे.

## निवडक

### बिहारमधील ७२ टक्के मंत्र्यांवर गुन्हे दाखल

**नवी दिल्ली** : बिहारमधील नव्याने स्थापन झालेल्या सरकारमधील ७२ टक्के म्हणजेच ३१ पैकी २३ मंत्र्यांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. याहून गंभीर म्हणजे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्यावरही गुन्हे आहेत. २०२०च्या विधानसभा निवडणुकीत सादर केलेल्या उमेदवारांच्या प्रतिज्ञापत्रांचे असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स आणि बिहार इलेक्शन वॉचने विश्लेषण केले आहे. त्यात ही बाब उघड झाली.

### अजित डोवालांच्या सुरक्षेत चूक; तीन कमांडो निलंबित

**नवी दिल्ली** : देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या सुरक्षेत झालेल्या चुकीमुळे संबंधित तीन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. फेब्रुवारीमध्ये एक वाहन त्यांच्या घराच्या गेटवर पोहचले तेव्हा हे कमांडो एनएसएच्या संरक्षणात गुंतले होते. या प्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केलीय.

## भाजप माणगाव शहराध्यक्षपदी नितीन दसवते

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या तसेच भाजप नेते आमदार प्रवीण दरेकर, जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आदेशाने पक्षाच्या माणगाव शहर अध्यक्षपदी माजी उपसरपंच नितीन रामजी दसवते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना आमदार प्रशांत ठाकूर आणि माणगाव तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

भाजपची आढावा बैठक नुकतीच माणगाव येथील खरे हॉलमध्ये झाली. या बैठकीस भाजपचे प्रदेश सरचिटणीस रवी मुंढे, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

आपल्या नियुक्तीबद्दल प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना नितीन दसवते म्हणाले की, पक्षश्रेष्ठींनी आपल्यावर माणगाव शहराच्या अध्यक्षपदी धुरा विश्वासाने सोपविली असून त्यांचा विश्वास सार्थ ठरवेन. केंद्रात व राज्यात आता भाजपची सत्ता असून पक्षामार्फत विविध सामाजिक उपक्रम राबवून याचा लाभ बहुजन समाजातील लाभार्थ्यांना देण्याचा प्रयत्न करू.

या निवडीबद्दल भाजप तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे, उपाध्यक्ष यशोधरा गोडबोले, नगरपंचायतीचे पाणीपुरवठा सभापती राजेश मेहता, युवा नेते चिन्मय मोने, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष अश्विनी महाडिक, बाबुराव चव्हाण आदींनी नितीन दसवते यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पत्राचाळ घोटाळाप्रकरणी ईडीचे मुंबईत तीन ठिकाणी छापे

**मुंबई : प्रतिनिधी**

सुमारे १०३९ कोटी रुपयांच्या पत्राचाळ घोटाळाप्रकरणी सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) बुधवारी (दि. १७) मुंबईत अनेक ठिकाणी शोधमोहीम राबवली. त्यात पूर्व उपनगरातील काही ठिकाणांचा समावेश आहे. या प्रकरणी ईडीने नुकतीच शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांना अटक केली होती.

ईडीने आतापर्यंत गैरव्यवहाराच्या रकमेचा माग काढला असता एचडीआयएल कंपनीकडून प्रवीण राऊतच्या खात्यात सुमारे ११२ कोटी रुपये हस्तांतरित करण्यात आल्याचे आढळले होते. त्यापैकी एक कोटी आठ लाख रुपये संजय राऊत यांची पत्नी वर्षा राऊत यांना देण्यात आले. त्यातील ५५ लाख रुपये २००९-२०१०मध्ये कर्जाच्या (असुरक्षित) स्वरुपात वर्षा राऊत यांना मिळाले. त्यातून एक सदनिका खरेदी करण्यात आली. याशिवाय प्रवीण राऊतचे व्यावसायिक संबंध असलेल्या प्रथमेश डेव्हलपर्समार्फत वर्षा राऊत आणि संजय राऊत यांना ३७ लाख ५० हजार रुपयांचा फायदा मिळाला. त्यासाठी वर्षा आणि संजय राऊत यांनी अनुक्रमे १२ लाख ४० हजार व १७ लाख १० रुपये गुंतवणूक केली होती. अवनी इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीतील केवळ पाच हजार ६२५ रुपयांच्या गुंतवणुकीवर वर्षा राऊत यांना १३ लाख ९४ हजार फायदा मिळाला, अशीही माहिती ईडीने न्यायालयात दिली. याशिवाय संजय राऊत हे या प्रकरणाच्या कटातही सहभागी असून प्रवीण राऊत याचा मोहरा म्हणून वापर करण्यात आला. प्रवीणने संजय यांच्याशी असलेली जवळीक दाखवून म्हाडाकडून परवानगी मिळवल्याचा आरोप ईडीने केला आहे.

राऊत तुरुंगात असताना ईडीने आणखी पुरावे गोळा करण्यासाठी छापेमारी सुरू केली आहे. त्या अंतर्गत मुंबईतील मुलुंड, विक्रोळी, भांडूप या भागात ईडीने छापे टाकले.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला राज्यस्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विशेष सन्मान



**अलिबाग : प्रतिनिधी**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने विशेष प्राविण्यासह अव्वल स्थान मिळवत राज्यस्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार २०२१-२२ पटकाविला आहे. हा बहुमान मिळवणारे रायगड, नवी मुंबईतील हे एकमेव विद्यालय ठरले आहे. याबद्दल या विद्यालयाचा स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त अलिबागमधील जिल्हास्तरीय कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते बुधवारी (दि. १७) विशेष सन्मान करण्यात आला. संस्थेच्या वतीने कार्यकारी मंडळाचे सदस्य परेश ठाकूर आणि विद्यालयाच्या प्राचार्य राज अलोनी यांनी हा सन्मान स्वीकारला.

रायगड जिल्हा परिषदेच्या ना. ना. पाटील सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, राजेंद्र भालेराव, नितीन मंडलिक, शुभांगी नाखले, कृषी विकास अधिकारी लक्ष्मण खुरकुटे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम, माध्यमिक शिक्षण विभाग अधिकारी जोत्स्ना शिंदे-पवार, प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव, मुख्य लेखा, वित्त अधिकारी भगवान घाडगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या वतीने आयोजित स्वच्छ विद्यालय पुरस्कारासाठी राज्यातील बहुतांश शाळांनी सहभाग घेतला होता. त्याचे मूल्यमापन करून जिल्ह्यांनी प्रतिजिल्हा १४ शाळांचे नामांकन केले. त्यानुसार शाळांची राज्यस्तरीय मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण झाली. यात ग्रामीण प्राथमिक व माध्यमिक आणि शहरी प्राथमिक, माध्यमिक तसेच उपश्रेणी असे विभाग होते. त्या अनुषंगाने राज्याच्या शिक्षण मंत्रालयाकडून स्वच्छ विद्यालयांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये शहरी भागातील माध्यमिक शाळांमध्ये रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने फाइव्ह स्टार रेटिंगसह प्रथम क्रमांक पटकाविला. त्याचप्रमाणे राज्यातून एकूण २६ शाळांना राष्ट्रीय पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. त्यातही रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा समावेश आहे.

या बहुमानाबद्दल स्कूलच्या प्राचार्य, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सन्मान स्वीकारतेवेळी समन्वयक, शिक्षक, विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

## वेध गोपाळकाल्याचे...

(छाया : लक्ष्मण ठाकूर)



पनवेल : भगवान श्रीकृष्णाचा जन्मोत्सव अर्थात गोकुळाष्टमी व दहीहंडीच्या सणासाठी बाजारात मडक्यांसह विविध प्रकारचे साहित्य विक्रीसाठी आले आहे. नागरिक त्याची खरेदी करीत आहेत.

# ‘त्या’ अधिकारी, कर्मचाऱ्यांना पुन्हा नो एंट्री

## ▌टीईटी घोटाळाप्रकरणी शिक्षणमंत्री दीपक केसरकरांचे स्पष्ट निर्देश

**सावंतवाडी : प्रतिनिधी**

टीईटी घोटाळ्यात अडकलेले अधिकारी व कर्मचारी पुन्हा शिक्षण खात्यात येत असतील तर आपण त्यांना घेणार नाही. आपल्याला असे अधिकारी, कर्मचारी शिक्षण खात्यात नको. शिक्षण क्षेत्र पारदर्शक राहिले पाहिजे त्यात भ्रष्टाचार होणार नाही याची खबरदारी घेणार असल्याचे राज्याचे नवनियुक्त शालेय शिक्षण व मराठी भाषामंत्री दीपक केसरकर यांनी या दरम्यान सांगितले.



दीपक केसरकर यांना शालेय शिक्षण विभागाचे मंत्रिपद जाहीर झाल्यानंतर ते सावंतवाडीत आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी आपण मंत्रिपदावर नाराज नसून उलट काम करण्यास संधी मिळाली असल्याचे सांगितले.

मंत्री केसरकर म्हणाले, शिक्षण क्षेत्र हे बुद्धिवंत लोकांचे आहे. कोणताही विषय मांडत असताना तो अभ्यास पूर्ण मांडला पाहिजे या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संघटना आहेत. या सर्व संघटना आपले विषय हे अभ्यासपूर्ण मानतात. त्यामुळे आपणही अधिकचा अभ्यास केला पाहिजे. सर्व मंत्र्याचे विभाग रविवारी जाहीर झाले आहेत. त्यामुळे मी मुंबईत गेल्यानंतर या विभागाचा कार्यभार स्वीकारेन तसेच अधिकाऱ्यांकडून विभागाची संपूर्ण माहिती करून घेईन त्यानंतरच मी या विषयात अधिक प्रगल्भतेने बोलू शकणार असे केसरकर म्हणाले.

मला शालेय शिक्षण विभागाचा मंत्री म्हणून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी जी जबाबदारी दिली आहे ती मी सक्षमपणे पार पाडणार असून खात्यावर अजिबात नाराज नाही. उलट या क्षेत्रात काम करण्यासाठी अधिकचा वाव आहे. शिक्षण क्षेत्रात अनेक बुद्धिवंत लोक काम करतात त्यांच्याकडून याबद्दल माहिती करून घेईन. या विभागाला न्याय कसा मिळवून देता येईल ते बघेन असे मंत्री केसरकर म्हणाले. मध्यंतरी जो टीईटी घोटाळा झाला त्याबद्दल मला जरी पूर्ण माहिती नसली तरी यामध्ये शिक्षण विभागातील जे अधिकारी कर्मचारी समाविष्ट आहेत त्यांना पुन्हा शिक्षण विभागात घेता येणार नाही. शिक्षण विभागाचा कारभार हा पारदर्शक राहिला पाहिजे तसे माझे प्रयत्न राहतील, असे मत टीईटी घोटाळ्यावर बोलताना मांडले.

कोकण पट्ट्यातील डोंगरदऱ्यातील मुले शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत. प्रत्येकाला मुलभूत शिक्षणाचा अधिकार आहे. त्यामुळे कोकण पट्ट्यातील डोंगरदऱ्या राहणारी मुले शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत. त्यांना शिक्षणाच्या विविध सोयी करून देण्यात येतील. मध्यवर्ती ठिकाणी आश्रम शाळा किंवा इतर निवास व्यवस्था करण्यात येईल असेही केसरकर यांनी या वेळी सांगितले.

# नितीशकुमार खोटे बोलताहेत

## गृहमंत्री अमित शाह यांचे आरोपांना प्रत्युत्तर

**दिल्ली : प्रतिनिधी**

बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांना कॅबिनेटच्या दोन जागा हव्या होत्या. त्यांना दोन जागा मिळणार नसल्याचे सांगण्यात आले. ते आता खोटे बोलत असल्याचे भाजप कोअर कमिटीच्या बैठकीत गृहमंत्री अमित शाह यांनी स्पष्टीकरण दिले आहे.



जनता दल युनायटेडचे माजी नेते आरसीपी सिंह यांच्यावर नितीश कुमार यांच्या संमतीशिवाय केंद्रीय मंत्रिमंडळात सामील झाल्याचा आरोप होता, मात्र स्वत: आर.सी.पी सिंह आणि भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. नितीशकुमार यांच्या संमतीने त्यांना मंत्री करण्यात आले असल्याचे सिंह आणि भाजपा नेत्यांनी सांगितले आहे. भाजपा कोअर कमिटीच्या बैठकीत गृहमंत्री अमित शाह यांनी याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. दरम्यान, आर.सी.पी सिंह आपल्या संमतीशिवाय मंत्री झाले असल्याचा दावा नितीश कुमारांनी केला होता. यावर शाह यांनी नितीश कुमार खोटे बोलत असल्याचे प्रत्युत्तर दिले आहे. शाह पुढे म्हणाले, नितीशकुमारांना कॅबिनेटमध्ये दोन जागा हव्या होत्या. एक राज्यसभेसाठी आणि एक लोकसभेसाठी. परंतु भाजप फक्त एकच जागा देऊ शकतो असे जेव्हा त्यांना सांगण्यात आले, तेव्हा त्यांनी सिंह यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार. त्यानंतर शाह यांनी नितीशकुमारांना त्यांच्या मागणीवर फेरविचार करण्याचे आश्वासनही दिले होते.

# ओवे गावातील हरी मशीद ट्रस्ट मक्तबे रहीमीयातर्फे स्वातंत्र्य दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचा अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिन ओवे गावामधील सेक्टर ३० मधील हरी मशीद ट्रस्ट मक्तबे रहीमीया तर्फे मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या वेळी मशीदीचे इमाम मौलाना नदीम बुबेरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.





महोत्सव ट्रस्टचे सेकेटरी मन्सूर अ.रहीम पटेल यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष निसार पटेल, मुदस्सिर पटेल, ॲड. इर्शाद शेख आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते. या वेळी ओवे उर्दू शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली व देशभक्तीची घोषणा केली.

हरी मशिदीच्या आवारात मन्सूर पटेल यांनी झेंडावंदनाचा कार्यक्रम आयोजित करून व्याख्यानाद्वारे भारतीयांना देशभक्ती व बंधूभावाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सैय्यद इस्माईल यांनी केले.

# मुंबईकरांना ‘बेस्ट’ भेट

**मुंबई :** प्रवाशांचा प्रवास सुकर व्हावा यासाठी बेस्ट उपक्रमाने दुमजली बस आणि आसन आगाऊ आरक्षित करण्याची सुविधा असलेली प्रीमियम वातानुकूलित बसही दाखल करण्याचा निर्णय घेतला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय रस्ते वाहतूक महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १८ ऑगस्ट रोजी या दोन्ही बसना हिरवा कंदिल दाखविण्यात येणार आहे. मात्र दुमजली बस आणि प्रीमियम बस सप्टेंबरपासून प्रवाशांच्या सेवेत दाखल होतील.



सध्या बेस्ट उपक्रमाकडे ४५ विनावातानुकूलित बस आहेत. एकमजली बसमधून ५४ ते ६० प्रवासी प्रवास करू शकतात. दुमजली बसची प्रवासी क्षमता ७८ इतकी आहे. प्रवासी वाहून नेण्याची क्षमता अधिक असलेल्या दुमजली वातानुकूलित बस टप्प्याटप्प्यात प्रवाशांच्या सेवेत आणण्याचा निर्णय उपक्रमाने घेतला असून पहिली दुमजली बस ताफ्यात दाखल होत आहे. विजेवर धावणाऱ्या वातानुकूलित ९०० दुमजली बसचा निर्णय घेतला.

# पं. विष्णू पलुस्करांच्या जयंतीनिमित्त शास्त्रीय गायन

पनवेल : रामप्रहर वृत्त

भारतीय शास्त्रीय संगीत सर्वसामान्यांपर्यंत पोहचावे यासाठी आपले आयुष्य वेचणारे संगीतऋषी पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त पनवेल कल्चरल असोसिएशनच्या वतीने रविवारी (दि. २१) पनवेलमध्ये सुप्रसिद्ध गायक रायगडभूषण उमेश चौधरी आणि गायिका मधुरा सोहनी यांच्या शास्त्रीय गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

पनवेल कल्चरल असोसिएशन सभागृहात हा कार्यक्रम रविवारी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत होणार आहे. या वेळी संवादिनीवर नंदकुमार कर्वे, तर तबल्यावर प्रसाद सुतार यांची गायकांना साथ असणार आहे.

पं. विष्णू पलुस्करांनी ५ मे १९०१ रोजी लाहोर येथे गंधर्व विद्यालयाची स्थापना केली. त्याबद्दल भारतीय संगीत संस्था पलुस्कर यांची सदैव ऋणी रहाणार आहे. संगीताचा राजदरबारातून जनतेच्या घराघरात हा प्रवास घडविण्याचे काम करणारे पं. पलुस्कर यांच्या जयंतीनिमित्त शास्त्रीय गायन कार्यक्रमाचा कार्यक्रम होणार असून रसिक श्रोत्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
गुरुवार, दि. १८ ऑगस्ट २०२२ रोजी होणारे

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ७. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ ८. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ९. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)

**ग्रामीण लसीकरण**

■ तक्का ■ तोंडरे ■ नौपाडा ■ आसुडगाव ■ पेठ/रांजणपाडा ■ बेलपाडा विठ्ठल मंदिर

**ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.**

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**


## पनवेल महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**

**जाहीर ई-निविदा सूचना**

निविदा सूचना क्र.पमपा/बांधकाम/२३२१/प्र.क्र. १४/२०८३/२०२२ दिनांक : १७/०८/२०२२

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामांकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय विभागात योग्य त्या वर्गात नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी–१ शतमान पद्धतीनुसार जाहीर ई–निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/४४/२०२२–२३ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती –‘अ’ खारघर येथील सेक्टर–१९ मधील भूखंड क्र. १४ येथे प्रभाग कार्यालयाची उभारणी करणे. | ८,५१,६२,५६५/– |

या कामाच्या ई–निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. २३/०८/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**(तृप्ती सांडभोर)**
**अतिरिक्त आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

## सावधान नोटीस

सर्व लोकांस सदर जाहीर हरकतीने आवाहन करण्यात येत आहे की, मौजे वशेणी, ता. उरण, जि. रायगड सर्व्हे नं. १४३/८३ क्षेत्र ००–०८–६० आकार ०.९२ येथील ही मिळकतीबाबत सदर मिळकतीचे मालक १. श्री. सुरेश काळ्या ठाकूर २. कै. जनाबाई काळ्या ठाकूर ३. यशोदा मनोजकुमार बंगाली ४. रंजना नामदेव गावंड यांनी मी श्री. पर्जन्य चंद्रहास म्हात्रे यांच्या सोबत कायम खरेदीखत लिहून देण्याचा व्यवहार केलेला असून सदर मिळकतीबाबत माझेकडून एकूण रक्कमेपैकी काही रक्कम स्विकारलेली आहे. व उर्वरीत रक्कम कायम खरेदीखताचे वेळी देण्याचे ठरले होते. मी सदर मिळकतीचे मालक यांस काही रक्कम अदा केली असल्याने व सदरचा करार सदर मिळकतीचे मालक पूर्ण करून देत नसल्याने सदर मिळकतीचे मालकाविरुद्ध पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश व स्तर साो यांचे न्यायालयात दिवाणी दावा दाखल करणार आहे.

सबब सदरचे मिळकतीमध्ये इतर कोणत्याही त्रयस्त व्यक्तिने कोणत्याही प्रकारचा साठेकरार, खरेदीखत कुळमुखत्यारपत्र, गहाणखत, दान, बक्षीसपत्र, मृत्युपत्राने, हक्कसोडपत्राने, हस्तांतरण करू नये किंवा अन्य कोणत्याही मार्गाने कोणत्याही प्रकारचा करार करून नये. सदरचा करार केल्यास तो माझेवर बंधनकारक राहणार नाही. याबाबत पूर्वसूचनेकरीता व सदरचे जाहीर आवाहन तमाम जनतेस करण्याकरीता सदरची सावधान नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. त्याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**सही/–**
**पर्जन्य चंद्रहास म्हात्रे**
**रा.मु.पो. कोप्रोली, ता. उरण**
**जि. रायगड. मो.नं. ९९३०८८३९४१**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे अशिलांची मालकीची मौजे– दुष्मी, तालुका पेण, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत जिचे विद्यमान मालक **श्री. राजु गणपत वाघे** व इतर दुष्मी, तालुका पेण, जिल्हा रायगड यांचे बरोबर ९९ वर्षांचा करारनामा करण्यांचे ठरविले आहे.

सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालील प्रमाणे

**मौजे – दुष्मी, तालुका पेण, जिल्हा रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे/गट क्र./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पैसे | संपूर्ण हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | ३५.१ | | | |
| | जिरायत | ०.८१.०० | ०.६५ | |
| | | | एकूण | ०.८१.०० |

वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या ९९ वर्षांचा करारनामा व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येऊन आमचे अशिल वरील मिळकतीच्या ९९ वर्षांचा करारनामाचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक : १७/०८/२०२२**
**ठिकाण : पनवेल**

**सही/–**
**ॲड. कांचन एस. पाटील**
**बी.ए.एलएल.बी.**

**पत्ता :** ऑफिस नं. २०१, दुसरा मजला, साई आर्केड, जी. पी. पारसिक बँकेवरती, लाईफ लाईन हॉस्पीटलजवळ, पनवेल बस स्टॅन्ड समोर पनवेल, जि. रायगड. ४१० २०६.
फोन : ८६८९८०९८९६/८१०८८८२६११

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे अशिलांची मालकीची मौजे– दुष्मी, तालुका पेण, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत जिचे विद्यमान मालक **श्री. ध्रुपद कृष्णा कातकरी व इतर**, दुष्मी, तालुका पेण, जिल्हा रायगड यांचे बरोबर ९९ वर्षांचा करारनामा करण्यांचे ठरविले आहे.

सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालील प्रमाणे

**मौजे – दुष्मी, तालुका पेण, जिल्हा रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे/गट क्र./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पैसे | संपूर्ण हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | ३५.२ | | | |
| | जिरायत | ०.८१.०० | ०.६५ | |
| | | | एकूण | ०.८१.०० |

वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या ९९ वर्षांचा करारनामा व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येऊन आमचे अशिल वरील मिळकतीच्या ९९ वर्षांचा करारनामाचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक : १७/०८/२०२२**
**ठिकाण : पनवेल**

**सही/–**
**ॲड. कांचन एस. पाटील**
**बी.ए.एलएल.बी.**

**पत्ता :** ऑफिस नं. २०१, दुसरा मजला, साई आर्केड, जी. पी. पारसिक बँकेवरती, लाईफ लाईन हॉस्पीटलजवळ, पनवेल बस स्टॅन्ड समोर पनवेल, जि. रायगड. ४१० २०६.
फोन : ८६८९८०९८९६/८१०८८८२६११

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे अशिलांची मालकीची मौजे– दुष्मी, तालुका पेण, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत जिचे विद्यमान मालक **श्रीम. गिरजा चिमण्या कातकरी,** दुष्मी, तालुका पेण, जिल्हा रायगड यांचे बरोबर ९९ वर्षांचा करारनामा करण्यांचे ठरविले आहे.

सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालील प्रमाणे

**मौजे – दुष्मी, तालुका पेण, जिल्हा रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे/गट क्र./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पैसे | संपूर्ण हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | ३५.३ | | | |
| | जिरायत | ०.८१.०० | १.२३ | |
| | | | एकूण | ०.८१.०० |

वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या ९९ वर्षांचा करारनामा व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येऊन आमचे अशिल वरील मिळकतीच्या ९९ वर्षांचा करारनामाचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक : १७/०८/२०२२**
**ठिकाण : पनवेल**

**सही/–**
**ॲड. कांचन एस. पाटील**
**बी.ए.एलएल.बी.**

**पत्ता :** ऑफिस नं. २०१, दुसरा मजला, साई आर्केड, जी. पी. पारसिक बँकेवरती, लाईफ लाईन हॉस्पीटलजवळ, पनवेल बस स्टॅन्ड समोर पनवेल, जि. रायगड. ४१० २०६.
फोन : ८६८९८०९८९६/८१०८८८२६११

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेले मिळकत **श्री. गणेश बबन गावडे,** रा.मु.पो. दुष्मी, तालुका पेण, जिल्हा रायगड, यांचे मालकीहक्काची, ताबेकब्जातील मिळकत असून सदरच्या मिळकत आमचे अशिल यांनी कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरलेले आहे. परिशिष्टात वर्णनात नमूद केलेली मिळकत खरेदीखत करणार असल्याने या कारणासाठी जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे – दुष्मी, तालुका पेण, जिल्हा रायगड

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| ३५ | १३ | ०–८१–०० | ०.६४ |
| | | पो.ख. ०–००–०० | |
| | | **एकूण ०–८१–००** | |

प्राप्त परिस्थितीवरील परिशिष्टात वर्णन केलेले जमिन मिळकती व कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचे व्यवहार करारमदार, वहिवाट, ताबाकबजा, मृत्यूपत्रांकित दान, बक्षिस, फरोक्त, भाडेपट्टा, चार्ज, लिअन वगैरे इतर हक्क हितसंबंध असल्यास सबळ पुराव्याचे कागदपत्रे हरकती १५ दिवसाचे मुदतीत लेखी हरकती कळवावेत.

वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध निर्विधात आहे असे गृहित धरून खरेदीखत करण्यात येईल मागावून येणारी हरकत, तक्रार वगैरे बंधनकारक राहणार नाही असे आमचे अशिलांमार्फत सुचविण्यांत येत आहे याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**दिनांक : १७/०८/२०२२**
**ठिकाण : पनवेल**

**सही/–**
**ॲड. कांचन एस. पाटील**
**बी.ए.एलएल.बी.**

**पत्ता :** ऑफिस नं. २०१, दुसरा मजला, साई आर्केड, जी. पी. पारसिक बँकेवरती, लाईफ लाईन हॉस्पीटलजवळ, पनवेल बस स्टॅन्ड समोर पनवेल, जि. रायगड. ४१० २०६.
फोन : ८६८९८०९८९६/८१०८८८२६११

# नियम पाळून दहीहंडी साजरी करा

## पोलिसांचे बैठकीत आवाहन



**पनवेल : वार्ताहर**

दहीहंडी सण साजरा करताना नियमांचे पालन करणे महत्वाचे असल्याचे प्रतिपादन पनवेल परिमंडळ २चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी बुधवारी (दि. १७) सार्वजनिक दहीहंडी आयोजक बैठकीत केले.

दहीहंडी सणानिमित्ताने सार्वजनिक दहीहंडीच्या आयोजकांची पोलीस ठाणे मंथन हॉल येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीला तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र दौंडकर, निरीक्षक अंकुश खेडकर, गोपनीय विभागाचे अंमलदार सचिन होळकर यांच्यासह हद्दीतील दहीहंडी आयोजक, पोलीस पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी सांगितले की, दहीहंडी उत्सवामध्ये सहभागी गोविंदाचे वय १४ वर्षांपेक्षा कमी नसावे, गोविंदा सशक्त व ताकतवान जवान असावे, दहीहंडी ठिकाणी जनरेटर, फायर फायटर, रुग्णवाहिका व गोविंदा पथकाचा विमा उतरविण्यात यावा, ध्वनीप्रदुषण टाळण्यासाठी आवाजाची मर्यादा विहीत डेसीबलपेक्षा जास्त नसावी, डीजे/डॉल्बी किंवा इतर कर्कश आवाजाची उपकरणे वापरू नये, तसेच शासनाकडून आलेल्या परिपत्रानुसार दहीहंडी व गणेशोत्सव सणाबाबत मार्गदर्शन करून त्यांनी आवश्यक त्या सूचना दिल्या.

बैठकीस दहीहंडी मंडळाचे एकूण ५१ पदाधिकारी उपस्थित होते, तसेच दहीहंडी मंडळातील आयोजकांना शांतता राखणे कामी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना फौजदारी प्रक्रिया १४९प्रमाणे नोटीस अदा करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांनी दिली.

**उरण : प्रतिनिधी**

उरणमध्ये दहीहंडी व गणेशोत्सव शांततेत साजरा करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या शासकीय नियमावलीची माहिती देण्यासाठी उरण पोलिसांनी बैठक आयोजित केली होती.

उरण येथील कोकण ज्ञानपीठ विद्यालयात उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुनील पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीसाठी सार्वजनिक चार व खासगी दहीहंडीचे ६० आयोजक, सदस्य तसेच विविध सात गोविंदा पथकाचे अध्यक्ष, सदस्य व गावातील मंडप, साऊंड डेकोरेटर्स, मालक मिळून ३५ आदी शंभराहून अधिक जण सहभागी झाले होते.

या वेळी मार्गदर्शन पोलिसांकडून उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले, दहीहंडी व गणेशोत्सव सणाबाबत पोलिसांकडून दिलेल्या सुचना, परिपत्रकानुसार दिलेल्या सुचनांचे पालन करावे आणि दहीहंडी व गणेशोत्सव सण



शांतता पुर्ण साजरा करण्याचे आवाहनही करण्यात आले. या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक गिजे, पोलीस उपनिरीक्षक गुरव, पोलीस उपनिरीक्षक तुरवाड आदी उपस्थित होते.

# कळंबोली ब्रिजवर अपघात; दोघांचा मृत्यू, एक जखमी

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली ब्रिजवर भरधाव कारवरील चालकाचे कारवरील नियंत्रण सुटून कारने अज्ञात वाहनाला पाठीमागून दिली. अपघातात कारमधील दोघा जणांचा मृत्यू, तर कारचालक जखमी झाल्याची घटना पुणे मुंबई लेन, एक्सप्रेस वेवर कळंबोली ब्रिजवर घडली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अपघातास जबाबदार असलेल्या कारचालक जयंत फकिराजी डांगे (वय ४६, रा. दिंडोशी गोरेगाव पूर्व) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या अपघातात मृत पावलेल्यांमध्ये शैलेद्र शुक्ला (वय ३४, रा. दिंडोशी) व शशिकुमार बैजनाथ प्रसाद (वय ४५, रा. अंधेरी) या दोघांचा समावेश आहे. दिंडोशी गोरेगाव पुर्व येथे राहणारा जयंत फकिराजी डांगे हा त्याची रेनॉल्ट कीव्हड कार (एमएच ४७ क्यु ०५७१) मधून त्याचे मित्र शैलेद्र शुक्ला व शशिकुमार बैजनाथ प्रसाद यांच्यासह गोवा येथे फिरण्यासाठी गेले होते. तेथून ते परत येत असताना पुणे येथून पुणे-मुंबई एक्सप्रेसवेने घरी जात होते.

या वेळी जयंत डांगे हा कार चालवित असतांना, पुणे मुंबई लेन, एक्सप्रेस वेवर कळंबोली ब्रिजवर डांगे याचे कारवरील नियंत्रण सुटून कारने अज्ञात वाहनाला पाठीमागून जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, कारच्या पुढील बाजुचा चक्काचूर होऊन पुर्णपणे नुकसान झालेले होते, तसेच कारमध्ये ड्रायव्हर सीटचे बाजुचे सीटवर एक व्यक्ती निपचीत अडकून पडलेला होता. घटनेची दरम्यान, माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी पोहचलेल्या पोलिसांनी अपघातग्रस्त कारमधील अडकलेल्या व्यक्तीस बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, मात्र सदरची कार पुर्णपणे दबलेल्या स्थितीत असल्याने शशिकुमार बैजनाथ प्रसाद, यास बाहेर काढता आले नाही. त्यामुळे घटनास्थळी पोलिसांनी फायर ब्रिगेडला पाचारण करून त्यांच्या मदतीने त्यास कार बाहेर काढून अम्ब्युलन्स मार्फत उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल केले असता, तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषित केले. दरम्यान, कारमधील चालक डांगे यास कुणीतरी उपचारासाठी एमजीएम हॉस्पीटल, कामोठे, येथे दाखल केले होते. तर अपघातग्रस्त कार मधील तिसरा इसम शैलेन्द्र शुक्ला (वय- ३४ वर्षे) यास कोणीतरी उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल केले असता, त्यालादेखील तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले आहे.

दरम्यान, मृत्यूस कारणीभूत ठरल्याने कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पनवेल, उरण परिसरात समूह राष्ट्रगीत गायनास प्रतिसाद



**पनवेल : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त राज्यात स्वराज्य महोत्सवांतर्गत बुधवारी (दि. १७) समूह राष्ट्रगीत गायन उपक्रम एकाच वेळी पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी राबविण्यात आला.

ओरियन मॉल पनवेल येथे प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त विठ्ठल डाके, तहसीलदार विजय तळेकर, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, ओरियन मॉलचे मंगेश परूळेकर आदी उपस्थित होते.

पालिका मुख्यालय, वडाळे तलाव, साई बाबा मंदिर, एमजीएम रूग्णालय कामोठे, चारही प्रभागातील डिमार्ट, बाजारपेठा, खारघरमधील लिटल वर्ल्ड मॉल, चौक, सोसायट्या तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांनी घंटागाडी ज्या ज्या विभागात उभी आहे अशा ८० ठिकाणी, महापालिकेच्या माध्यमातून जवळपास १०० हून अधिक ठिकाणी 'समूह राष्ट्रगीत गायन' उपक्रम राबविण्यात आला. महापालिका क्षेत्रातील प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, पदवी महाविद्यालये अशा सुमारे २५० शालेय संस्थाच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. तसेच खासगी आस्थापना, शासकीय आस्थापना, विविध संस्थांची कार्यालये अशा सुमारे ३०० हून अधिक ठिकाणी नागरिकांनी राष्ट्रभक्तीचे दर्शन घडविले.



पनवेल : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवनिमित्त राज्यात स्वराज्य महोत्सव साजरा केला जात असून त्या अनुषंगाने बुधवारी सकाळी ११ वाजता भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत समूह राष्ट्रगीत गायन झाले.



**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवांतर्गत स्वराज्य महोत्सव सप्ताहाची सांगता येथील रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत जुनिअर कॉलेजच्या प्रांगणात समूह राष्ट्रगीत गायनाने उत्साहात झाली.

रयतच्या गव्हाण विद्यालय व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी. एन. घरत जुनिअर कॉलेज ऑफ सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण विद्यालयाच्या प्रांगणात सकाळी ११ वाजता विद्यार्थी आणि शिक्षकांनी समूह राष्ट्रगीत गायन करून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित विविध उपक्रमांची व स्वराज्य सप्ताहाची सांगता झाली.

या वेळी गव्हाण विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रणिता गोळे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, विद्यालयाचे पर्यवेक्षक दीपक भर्णुके, जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, गव्हाण विद्यालयाचे क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाचे क्रीडा शिक्षक नितीन म्हात्रे, कुऱ्हाडे व दोन्ही विद्यालयांचे सर्व शिक्षक, कर्मचारी व मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

**खारघर : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने बुधवारी (दि. १७) सकाळी ११ वाजता सामुदायिकरित्या राष्ट्र गायनाचे आयोजन करणेबाबत शासनाकडून आदेश प्राप्त झाले होते. त्यानुसार शहरातील नागरिकांमध्ये देशभक्ती वृध्दीगत होवून सद्भावना निर्माण होण्याचे दृष्टीने खारघर भाजपच्या अनेक कार्यकर्त्यांनी पक्ष कार्यालय, बाजारपेठ, स्वच्छतादूत व विद्यार्थी यांच्यासोबत एक मिनिट जागेवर उभे राहून या अभियानात सहभाग घेतला.

खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, जिल्हा चिटणीस गीता चौधरी, उपाध्यक्ष दिलीप जाधव, नवनीत मारू, भरत कोंढाळकर, अशोक जंगीड, गिरीश गुप्ता, शैलेंद्र त्रिपाठी, चेतन कसबले, विजय बागडे व इतर कार्यकर्ते यांनी जनसंपर्क कार्यालयात तर माजी नगरसेवक निलेश बाविस्कर यांनी स्वच्छतादूत व रहिवाशांसोबत समूह राष्ट्रगीत गायन केले.

खारघर कायदा सेलचे संयोजक ॲड. राजेंद्र अग्रवाल यांनी त्यांच्या कार्यालयात गायनाचे आयोजन केले. खारघर मंडल सरचिटणीस दीपक शिंदे यांनी शालेय विद्यार्थी यांना राष्ट्रगीताची माहिती व व महत्व समजावून त्यांच्यासोबत एकत्रित गायन केले.







पनवेल : ठाकूर इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि. (टीआयपीएल)च्या वतीने सामूहिक राष्ट्रगीत गान करण्यात आले. या वेळी 'टीआयपीएल'चे संचालक धनंजय करतुरी, भरणीकुमार, एचआर मॅनेजर शशिकांत मुंबईकर, अकाउंट मॅनेजर अरुण नाईक यांच्यासह कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते.



पनवेल : स्वराज्य महोत्सवांतर्गत तालुका पोलीस ठाणे आवारात सामूहिक राष्ट्रगीत गायन करण्यात आले. या वेळी पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, वरीष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्यासह अधिकारी, अंमलदार आदी उपस्थित होते.



उरण : तालुक्यातील मोरा येथील ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड येथील ॲडमिनचे व्यवस्थापक आय. बी. सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्यात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामूहिकरीत्या राष्ट्रगीत गायले.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाची सांगता

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये मंगळवारी (दि.१७) स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या अभियानाचा शेवटचा दिवस सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे म्हणून पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक हरेश केणी, युवा मोर्चोचे अध्यक्ष विनोद घरत, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रभाकर जोशी, खारघर युवा मोर्चोचे खजिनदार प्रमोद पाटील हे मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड, उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर, अंतर्गत गुणवत्ता सिदधता कक्षच्या समन्वय प्रा. महेश्वरी झिरपे सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये विविध देशभक्तीपर विषयावर नृत्य व नाटकांचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात अतिथी देवो भवो ने झाली. त्यानंतर सात्वित आहाराचे महत्व सांगत उपस्थितांना



'सात्विक आहार देण्यात आले. यानंतर 'मानवसेवा हीच खरी ईश्वर सेवा' आणि दानधर्म करावा हा संदेश देण्यात आला. त्याचबरोबर 'जय जवान, जय किसान, 'आय लव माय इंडिया' जल्लोष स्वातंत्र्याचा ही शेवटची थीम होती.

या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. राहुल कांबळे यांनी केले. तसेच मिनल मांडवे, प्रा. मीरा पटेल, प्रा. राजश्री म्हात्रे यांनी सहकार्य केले.

कार्यक्रम अतिशय उत्तमरित्या झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र संस्थेचे यांनी आयोजकांचे व विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेच उपाध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३२

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. भारताला आपल्या गरजेच्या इतके टक्के इंधनाची आयात करावी लागते?**
***अ.*** १०० टक्के ***आ.*** ८५ टक्के ***इ.*** ६० टक्के ***ई.*** ५० टक्के

**२. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी फेब्रुवारी २०१९ पासून देशातील किती शेतकरी कुटुंबांना मिळतो आहे?**
***अ.*** १२ कोटी ***आ.*** ५ कोटी
***इ.*** ८ कोटी ***ई.*** १० कोटी

**३. जगातील सुमारे शंभर देशांना मोटारींची निर्यात करणारी भारतीय कंपनी कोणती?**
***अ.*** टाटा मोटर्स ***आ.*** बजाज
***इ.*** मारुती सुझुकी ***ई.*** महिंद्रा अँड महिंद्रा

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# विरोधासाठी विरोध कशासाठी?

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन बुधवारपासून सुरू झाले. या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांच्या चहापानावर बहिष्कार टाकत विरोधकांनी संघर्षाची नांदी केली होतीच. पण आपले महाविकास आघाडीचे सरकार कोसळल्यामुळे अद्यापही नैराश्याने ग्रासलेल्या या विरोधकांकडे सरकारविरोधात कोणतेही ठोस मुद्देच नाहीत हेही पहिल्याच दिवशी पुरते स्पष्ट झाले.

**महाराष्ट्रात राजकीय सत्तांतर होऊन दीड महिना लोटला आहे. या सत्तांतरादरम्यान शिवसेना पक्षातील आमदार मोठ्या संख्येने फुटले आणि त्यातले काही एव्हाना मंत्रिपदाचा कारभार हातात घेऊन कार्यरतही झाले आहेत. तरीही शिवसेनेतील उद्धव ठाकरे समर्थक गट अद्यापही त्या धक्क्यातून अजिबातच सावरलेला नाही असे दिसते. ठाकरे समर्थकांना या फुटीचा धक्का बसणे अगदी स्वाभाविक आहे. परंतु त्यांच्यासोबत असलेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना अजुनही हा सत्ताबदल पचनी पडलेला नाही, हे आज अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर विरोधकांकडून ज्या तऱ्हेच्या घोषणा देण्यात आल्या, त्यातून पुरते स्पष्ट होते. 'पन्नास खोके, एकदम ओक्के' अशी घोषणाबाजी करणारे विरोधक मनाने बहुदा अजूनही गुवाहाटीतच रेंगाळत असावेत. एव्हाना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या मंत्रिमंडळाने जनतेची कामे हाती घेतली आहेत. वास्तविक हीच मंडळी कालपर्यंत महाविकास आघाडीसोबत सत्तेत होती. परंतु आता मात्र ते नुसते गद्दार ठरले नाहीत तर नाकर्तेसुद्धा ठरले आहेत. कालपरवापर्यंत आपले सहकारी असलेल्या या लोकप्रतिनिधींविरोधात अशा प्रकारची घोषणाबाजी करताना आपले तीन चाकी महाविकास आघाडी सरकार नेमक्या कशाप्रकारे अस्तित्वात आले होते याचा मात्र या विरोधकांना अतिशय सोयीस्करपणे विसर पडलेला दिसतो. जनतेचा कौल पायदळी तुडवून आपण मागील दाराने सत्ता बळकावली आणि उणीपुरी अडीच वर्षे निव्वळ केंद्र सरकारकडे बोट दाखवण्याचे काम केले हे पूर्णपणे विसरून तूर्तास हे विरोधक टीकेसाठी सरसावत आहेत. विधिमंडळाच्या पायऱ्यांवर बोलताना ठाकरे समर्थकांचे नेते आदित्य ठाकरे यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर जे तोंडसुख घेतले त्यामधून त्यांची हतबलताच अधिक स्पष्ट झाली. सभागृहाचे कामकाज स्थगित झाल्यानंतर आदित्य ठाकरे यांनी शिवसंवाद यात्रेच्या निमित्ताने थेट अलिबाग गाठले. शिंदे-फडणवीस सरकार बेकायदेशीर आहे अशी टीका आता आदित्य ठाकरे यांच्यापासून काँग्रेसच्या बाळासाहेब थोरात यांच्यापर्यंत महाविकास आघाडीचे सारेच नेते करत आहेत. शिंदे-फडणवीस सरकार विधिमान्य आहे की नाही हे अजून सर्वोच्च न्यायालयात ठरायचे आहे. त्या आधीच न्यायदान करून महाविकास आघाडीचे नेते मोकळे झाले आहेत. विधिमंडळाच्या पायऱ्यांवर सकाळच्या सत्रात घोषणाबाजी करताना विरोधी आघाडीचे आमदार गालातल्या गालात हसत होते. त्यावरून आपल्या आक्रमक पवित्र्याला फारशी धार नाही हे त्यांचे त्यांनाच कळले होते असे दिसते. सरकार पक्षाला विरोध करणे हे विरोधीपक्षांचे कर्तव्यच असते. लोकशाहीला तेच अभिप्रेत आहे. परंतु विरोधासाठी विरोध केल्यामुळेच वेळेचा तेवढा अपव्यय होईल. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी नव्या सरकारला अपशकुन करण्यापेक्षा विरोधीपक्षाने सुरूवातीला तरी सहकार्याची भूमिका घेणे अपेक्षित होते. विरोध करण्याजोगे मुद्दे विधिमंडळाच्या कामकाजात रीतसर उपस्थित करता येतीलच. त्यासाठी घटनेने अनेक कायदेशीर आयुधे उपलब्ध करून दिलेली आहेत. गुवाहाटीचे राजकारण विसरून आता विरोधकांनी जुळवून घ्यावे आणि सभागृहाचे कामकाज सुरळीत चालू द्यावे एवढीच जनतेची अपेक्षा आहे.**

# गोकुळाष्टमी, दहीहंडीचा सर्वत्र उत्साह

जन्माष्टमी म्हणजे गोकुळ अष्टमी. कृष्ण जन्माचा हा दिवस. श्रावण महिन्यात वद्य अष्टमी या तिथीला मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर मथुरेत श्रीकृष्णाचा जन्म झाला, म्हणून या दिवशी आनंदोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. भारताच्या विविध प्रांतात हा उत्सव विविध प्रकारे आणि तेवढ्याच उत्साहाने साजरा होतो.

गोकुळ, मथुरा, वृंदावन, द्वारका, जगन्नाथ पुरी या ठिकाणी हा उत्सव मोठ्या प्रमाणावर होतो. ओरिसामध्ये दहीहंडी जत्रा या दिवशी साजरी केली जाते. गोकुळ अष्टमीच्या दिवशी उपवास करण्याची प्रथा आहे. गुजरातमध्ये 'सातम' म्हणजे पत्ते खेळतात. रात्री बारा वाजता पत्ते बंद करून कृष्णजन्माचा उत्सव सुरू करतात. मध्य प्रदेशात आणि उत्तर भारताच्या बऱ्याचशा भागात पौर्णिमान्त महिना असलेले पंचांग वापरात असल्याने या दिवशी त्यांची भाद्रपद कृष्ण अष्टमी येते. या दिवशी कित्येकांच्या घरी गोकुळ-वृंदावनाचा देखावा तयार करून जन्मोत्सव साजरा करतात. वैष्णव लोक तर हा दिवस विशेष भक्तीने पाळतात. वृंदावन येथे या दिवशी दोलोत्सव असतो. अष्टमीच्या दिवशी एकभुक्त राहून पांढऱ्या तिळाचा कल्क अंगाला लावून स्नान करतात. व्रताचा संकल्प करून देवघर लता पल्लवांनी सुशोभित करतात. त्या स्थानी देवकीचे सुतिकागृह स्थापन करतात. मंचकावर देवकी आणि कृष्ण यांच्या मूर्तीची स्थापना करतात. दुसऱ्या बाजूला यशोदा आणि तिची नवजात कन्या, वसुदेव, नंद, यांच्या मूर्ती बसवितात. सप्तमीच्या मध्यरात्री शुचिर्भूत होऊन संकल्प करतात व सपरिवार श्रीकृष्णाची षोडशोपचार पूजा करतात. रात्रौ कथा, पुराण, नृत्य, गीत इ. कार्यक्रमांनी



जागरण करतात. अष्टमीच्या दिवशी उपवास करतात व देवालाही फराळाच्या जिन्नसांचा नैवेद्य दाखवितात. नवमीच्या दिवशी पंचोपचार करून उत्तरपूजा करून महानैवेद्य समर्पण करतात. पूजा झाल्यानंतरचे कृत्य अग्नी पुराणात सांगितले आहे. याप्रमाणे पूजा करून पुरुषसूक्ताने, विष्णूसूक्ताने व इतर स्तोत्रांनी स्तवन करावे. वाद्यांचा घोष, गीतांचे मंगल स्वर, पुराण-इतिहासातील निरनिराळ्या सत्कथा ऐकत ती रात्र घालवावी. गोकुळातील कृष्णजन्माच्या लीला श्रवण केल्यानंतर



वैष्णवांनी परस्परांवर दही इ. चे सिंचन करावे. कारण गोपाळांनी दही, दूध, तूप, उदक, यांनी परस्परांवर सिंचन व लेपन केले असे भागवतामध्ये वचन आहे, त्यावरून असा विधी प्राप्त होतो. उत्सवासाठी तयार केल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रसादास गोपालकाला असे म्हणतात. कृष्ण जयंतीचा उत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो.

महाराष्ट्रात विशेषतः कोकणात या उत्सवानिमित्त दुसऱ्या दिवशी दहीकाला होतो व त्याचे सेवन करून उपवास सोडला जातो. गोविंदा आला रे आला। गोकुळात आनंद झाला।। असे गाणे गात अनेक लहानथोर पुरुष घरोघरी नाचायला जातात व दहीहंडी फोडतात. कित्येक ठिकाणी गोपाळकाला करून कृष्ण चरित्रातील सोंगे आणण्याचाही प्रघात आहे. या दिवशी महाराष्ट्रात, विशेषतः मुंबईत, उंच मडक्यात दही-दुधाने भरलेला हंडा ठेवून तेथपर्यंत मानवी मनोऱ्यावरून पोहचून तो हंडा फोडण्याचा 'गोविंदा' हा साहसी खेळ होतो. हा महाराष्ट्रातील एक वैष्णव नृत्योत्सव आहे. श्रीकृष्णाने व्रज मंडळात गाई चारताना आपण व आपले सवंगडी या सर्वांच्या शिदोऱ्या एकत्र करून त्या खाद्य पदार्थांचा काला केला व सर्वांसह त्याचे सेवन केले अशी कथा आहे. या कथेला अनुसरून गोकुळाष्टमीच्या दिवशी एका सजवलेल्या मडक्यात काला करून ते दोरीच्या सहाय्याने उंचावर बांधण्याची व मानवी मनोरे रचून ती दहीहंडी फोडण्याची प्रथा आहे. जास्तीत जास्त उंचीवर जाऊन हंडी फोडणाऱ्या गोविंदा पथकाला आकर्षक बक्षीस दिले जाते. यावेळेस गाणी, नृत्य, विविध कार्यक्रम होतात व बघणाऱ्यांची जल्लोषासहित मोठी गर्दी जमलेली असते.

गोपाल म्हणजे गायीचे पालन करणाऱ्या कृष्णाच्या या जन्मोत्सवाच्या निमित्ताने काल्याचा प्रसाद केला जातो. काला म्हणजे एकत्र मिळविणे. पोहे, ज्वारीच्या लाह्या, धानाच्या लाह्या, लिंबू व आंब्याचे लोणचे, दही, ताक, चण्याची भिजविलेली डाळ, साखर, फळांच्या फोडी इत्यादी घालून केलेला एक खाद्यपदार्थ. हा कृष्णास फार प्रिय होता असे मानले जाते. श्रीकृष्ण व त्याचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर हा तयार करीत असत व वाटून खात असत असे मानले जाते. गोमंतकात याच काल्याला गवळणकाला म्हणतात.

**(साभार विकीपिडिया)**

### गोविंदा पथके सज्ज

गेले दोन वर्षे कोरोना महामारीमुळे सण उत्सवांवर निर्बंध होते. या मुळे सण उत्सव अगदी साधेपणाने झाले. त्यानंतर स्थितीपूर्वपदावर आल्यानंतर नियम शिथिल झाले. यावर्षी तर सण मोठ्या उत्सवाने साजरे होताना दिसत आहेत. सगळीकडे उत्साह दिसून येत आहे. रक्षाबंधन, नागपंचमी, नारळीपौर्णिमेनंतर आता गोकुळाष्टमी आणि दहीहंडीसाठी सर्व सज्ज झाले आहेत. दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत तर दहीहंडी गोविंदा पथकांना १० लाखाचे विमाकवच देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. एकूणच सर्व पार्श्वभूमीवर दहीहंडी पथकांनी सगळीकडे सराव सुरु केला असल्याचे दिसून येत आहे. सगळीकडे दहीहंडीचा उत्साह आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल असिस्टंटचा आवाज बदलण्यासाठी वापरा 'या' स्टेपस्

गुगल असिस्टंट सारख्या व्हर्च्युअल असिस्टंटने लाखो स्मार्ट डिव्हाइस युजर्सचे जीवन सोपे केले आहे. हे युजर्सना हँड्सफ्री पद्धतीने अनेक कामे करण्याची मोकळीक देते, ज्यामुळे दैनंदिन कामे करणे सोपे होते. या कामांमध्ये



रोबोट व्हॅक्यूम क्लिनर नियंत्रित करणे, दिवे बंद करणे यासारख्या दैनंदिन कामांचा समावेश होतो. गुगल असिस्टंटबद्दल बोलायचे झाले तर, साधारणपणे आपण गुगलचे आर्टिफिशियल इंटेलिजेंस आधारित स्मार्ट असिस्टंट एकाच आवाजात ऐकतो. पण जर तुम्हाला रोज तोच आवाज ऐकण्याचा कंटाळा आला असेल आणि तुम्हाला गुगल असिस्टंटच्या आवाजात बदल करायचा असेल तर तुम्ही याचा आवाज बदलू शकता. आज आपण गुगल असिस्टंटचा आवाज बदलण्याची प्रक्रिया कोणती आहे ती, स्टेप-बाय-स्टेप जाणून घेऊया.


गुगल ॲपवरून गुगल असिस्टंटचा आवाज बदलण्यासाठी गुगल ॲपच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात तुमच्या प्रोफाइल आयकॉनवर टॅप करा. आता सेटिंग्ज बटणावर टॅप करा. यानंतर खालील स्क्रीनमध्ये गुगल असिस्टंट निवडा. आता ऑल सेटिंग्ज सेक्शनमध्ये असिस्टंट व्हॉईस आणि साउंड्स पर्यायावर टॅप करा. येथे सर्व आवाज ऐकण्यासाठी, व्हॉइस प्रीसेटमधून स्क्रोल करा आणि तुम्हाला वापरू इच्छित असलेल्या आवाजावर टॅप करा. सर्वप्रथम तुमच्या गुगल असिस्टंट पॉवर्ड स्मार्ट डिस्प्लेवर गुगल होम ॲप उघडा. नंतर डिस्प्लेच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात असलेल्या तुमच्या प्रोफाइल फोटोवर टॅप करा. आता असिस्टंट सेटिंग्ज पर्यायावर टॅप करा. ऑल सेटिंग्ज सेक्शनमध्ये, असिस्टंट व्हॉइस पर्यायावर टॅप करा. त्यानंतर खाली स्क्रोल करून तुम्हाला वापरायचा असलेला आवाज निवडण्यासाठी टॅप करा. अँड्रॉइड स्मार्टफोनवर गुगल असिस्टंटचा आवाज बदलण्यासाठी, आधी 'हे गुगल' बोलून किंवा तुमच्या फोनच्या बाजूला असलेले गुगल असिस्टंट बटण दाबून तो तुमच्या स्मार्टफोनवर सक्रिय करा. आता 'आवाज बदला' म्हणा. यानंतर तुमच्या स्मार्टफोनच्या स्क्रीनवर मॅनेज व्हॉईस सेटिंग्जच्या बटणावर टॅप करा. आता, सर्व आवाज ऐकण्यासाठी व्हॉइस प्रीसेटमधून स्क्रोल करा आणि तुम्हाला वापरायचा असलेल्या आवाजावर टॅप करा.

# निखळ माणूसपण जपणारे गुलजार

गुलजार यांचे खरे नाव सिंह कालरा आहे. भारतातील एक कवी, गीतकार, हिंदी चित्रपट दिग्दर्शक, निर्माते अशा बहुमुखी प्रतिभेचे धनी गुलज़ार यांचा जन्म १८ ऑगस्ट १९३६ रोजी झाला. हिंदी चित्रपटसृष्टीवर गेली ५० वर्षे कवी, गीतकार, लेखक, दिग्दर्शक अशा विविध भूमिकांमध्ये आपली छटा उमटविणाऱ्या गुलजार यांना २०१३मध्ये दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला तेव्हा हा 'आपल्या माणसा'चा गौरव आहे, अशीच भावना समाजाच्या सगळ्या क्षेत्रांमधून, सगळ्या स्तरांमधून उमटली. समाजमान्यता, अनेक पुरस्कार, गौरव, यश या सगळ्या टप्प्यावर स्वत:मधले निखळ माणूसपण जपणाऱ्या गुलजार यांच्याविषयी...

गुलजार यांना लहानपणापासून गीतांच्या भेंड्यांमध्ये भाग घ्यायला आवडत असे. त्यावरून त्यांना पुढे कविता व नंतर उत्तर हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात रस वाटू लागला. ते शेजाऱ्यांकडे जाऊन तंतुवाद्य वाजविण्याचा अभ्यास करीत. गुलजार जेव्हा महाविद्यालयात गेले तेव्हा ते नियमितपणे रविशंकर आणि अली अकबर खान यांच्या सारख्यांच्या वाद्यसंगीताच्या कार्यक्रमांना जाऊ लागले.

हिंदुस्तानची फाळणी झाल्यानंतर गुलजार यांचे कुटुंब फार वर्षे पाकिस्तानात राहू शकले नाही. ती मंडळी भारतात



अमृतसरला आली आणि गुलजार मुंबईला. इथे ते एका मोटार गॅरेजमध्ये काम करू लागले. मुंबईत त्यांना हिंदी चित्रपटांचे आकर्षण वाटू लागले. फावल्या वेळात ते कविता करत. बिमल रॉय, हृषीकेश मुखर्जी आणि हेमंत कुमार यांना भेटून ते आपल्या कविता वाचून दाखवू लागले. परिणामी बंदिनी चित्रपटासाठी गुलजार यांनी 'मोरा अंग अंग लै ले, मुझे श्यामरंग दै दे' हे गाणे लिहिले आणि ते बिमल रॉय यांचे पूर्णवेळचे असिस्टंट झाले. ते गाणे अतिशय लोकप्रिय झाले आणि गुलजार यांना जिकडे तिकडे गीतलेखनासाठी बोलावणी येऊ लागली. नंतरच्या काळात गुलजार यांनी हृषीकेश मुखर्जी, असित सेन यांच्या चित्रपटांसाठीही गीते लिहिली. गुलज़ार हे हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या विशिष्ट शब्दशैलीसाठी ओळखले जातात. ज्या सामान्यतः गीतांमध्ये वापरल्या जात नाहीत, अशा प्रतिमा गुलज़ार यांच्या गीतांमध्ये ठिकठिकाणी वापरलेल्या आढळतात. उदाहरण म्हणून ही गिते देता येतील. सत्या चित्रपटील अतिशय लोकप्रिय गीत-सपने में मिलती हैं! हे गीत नावीन्यपूर्ण प्रतिमा वापरून अगदी हृदयंगम झाले आहे. सारा दिन सडकों पे खाली रिक्षे सा पीछे पीछे फिरता है। बंटी और बबलीमधील आँखें भी कमाल करती हैं पर्सनल से सवाल करती है। हे फक्त काही नमुने आहेत. गुलज़ार यांचे प्रत्येक गीत अशा प्रतिमांनी पुरेपूर असते. गुलज़ार यांनी अनेक चित्रपटांसाठी गीते लिहिली आहेत. यामध्ये आनंद, ओंकारा, खामोशी, गुड्डी, जान-ए-मन, थोडीसी बेवफाई, दो दूनी चार, नमकहराम, बंटी और बबली, बावर्ची, सफर यांचा समावेश आहे. गुलजार यांनी निर्माण केलेले चित्रपट या प्रमाणे-अंगूर, अचानक, आँधी, किनारा, कोशिश, खुशबू आदिंचा समावेश आहे. त्यांची पुस्तके या प्रमाणे- बोस्की (कवितासंग्रह), तक़सीम (हिंदी कथासंग्रह), देवडी (मूळ हिंदी कथासंग्रहाचा मराठी अनुवाद-अनुवादक अंबरीश मिश्र), धुआँ (हिंदी कथासंग्रह), मिर्झा गालिब (मराठी अनुवाद-अंबरीश मिश्र). गुलजार यांना अनेक पुरस्कार मिळाले. यामध्ये साहित्य अकादमी पुरस्कार २००२ मध्ये धुआँ या कथासंग्रहासाठी, पद्मभूषण पुरस्कार २००४मध्ये ऑस्कर पुरस्कारही त्यांना मिळाला आहे.



### क्लिक...क्लिक...!

**नवी मुंबई : कोरोना महामारीनंतर दोन वर्षांनी सर्व नियम शिथिल झाल्यानंतर आता सर्वच सण-उत्सव मोठ्या उत्साहात साजरे होऊ लागले आहेत. दहीहंडी हा बच्चेकंपनी आणि युवकांचा आनंदमय सण म्हटला जातो. हा सण एका दिवसावर आला असून सगळीकडे गोविंदा पथकांचा जोरदार सराव सुरू आहे. गोविंदा पथके थरांवर थर रचून रंगीत तालीम घेत आहेत. अशाच प्रकारे वाशी जुहूगाव येथील गावदेवी गोविंदा पथकाचा सराव अंतिम टप्प्यात आला आहे. न्यायालयाच्या नियमात राहून थर लावण्याकडे गोविंदा पथकांचे लक्ष आहे.**

(छाया : शशिकांत बारसिंग)

## आरोग्य प्रहर

# त्वचेच्या अनेक समस्यांवर बदामाचे तेल उपयुक्त

शरीर व मनाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी औषध व अन्न अशा दोन्ही स्वरूपात बदाम वापरले जातात. सुकामेव्यातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे बदाम होय.



कोणताही गोड पदार्थ केला की त्यावर बदाम हे हवेच. चवीला उत्तम असणाऱ्या बदामाचे अनेक गुणकारी फायदे आहेत. परंतु, बदाम केवळ स्मरणशक्ती वाढविण्यासाठीच वापरले जातात असा अनेकांचा समज आहे. मात्र बदाम खाण्याचे अनेक शारीरिक फायदे आहेत. बदामात उत्तम आरोग्यासाठी आवश्यक असणारे अनेक घटक असतात. यामध्ये केवळ पोषणमूल्ये आणि जीवनसत्त्वेच नसतात तर त्यामुळे पदार्थाला स्वाद येतो. गोड पदार्थांमध्ये बदाम खूपच छान लागतात. बदामाला सुक्या मेव्याचा राजा म्हणूनही ओळखले जाते. कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, नायसिन, 'ब' जीवनसत्त्व, तंतूमय व पिष्टमय पदार्थ, खनिज, प्रथिने, बदामात असतात. स्मृतिभ्रंश, विस्मरण या आजारांसाठी बदाम उपयुक्त आहे. शरीर व मनाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी औषध व अन्न अशा दोन्ही स्वरूपात बदाम वापरले जातात. शरीरामध्ये रक्ताचे प्रमाण वाढण्यास बदामाची मदत होते. बदाम खाण्याचे फायदे या प्रमाणे आहेत. यात हृदयासंबंधीत समस्या दूर होण्यास मदत मिळते. रक्तातील साखर नियंत्रणात राहते. वजन कमी होते. डोळ्यासंबंधीत तक्रारी दूर होतात. पचनक्रियेचे कार्य सुरळीत होते. अपचन, गॅसेस समस्या दूर होतात. कानदुखत असल्यास बदामाच्या तेलाचे एक दोन थेंब टाकावेत. कानदुखी थांबते. शांत झोप लागते. त्वचा उजळते. डोळ्याखालील काळी वर्तुळे कमी होतात. त्वचेसंबंधीत समस्या दूर होतात. केसांची वाढ होते. अंगदुखत असल्यास बदामाच्या तेलाने हातापायांची मालिश करावी. चेहऱ्याचा पोत, रंग सुधरण्यासाठी बदामाचे तेलाचा लेप तयार करावा. यासाठी एक मोठा चमचा बदाम तेल घेऊन त्यात एक चमचा गुलाबपाणी मिक्स करावे. त्यानंतर हा पॅक चेहऱ्यावर लावावा आणि १५ मिनिटांनंतर चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ धुवून घ्यावा. बदामाचे सेवन करायचे असल्यास एक कप दुधात २-३ चमचे बदाम तेल टाकावे. बदामाचे अनेक उपयोग आहेत, मात्र आपल्याला ते माहित नसतात. या मुळे जे जाणून घेणे महत्वाचे आहे. दरम्यान, येथे देण्यात आलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे. अधिक महितीकरिता आपल्या तज्ज्ञांचा सल्ला प्रत्येकाने घ्यावा.

# मुरूडसह रायगडात राष्ट्रगीताचे सामूहिक गायन



(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत रायगड जिल्ह्यात बुधवारी (दि. १७) राष्ट्रगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. त्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुरूड नगर परिषद कार्यालयाजवळही सामूहिक राष्ट्रगीत गायन झाले.

या वेळी नागरिकांनी भारतमाता की जय, वंदे मातरम अशा घोषणा दिल्या. त्यामुळे वातावरण देशभक्तीपर बनले होते.

मुरूड पालिकेतर्फे आयोजित सामूहिक राष्ट्रगीत गायनावेळी प्रशासक पंकज भुसे, कार्यालयीन प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, राकेश पाटील, प्रशांत दिवेकर, नरेंद्र नांदगावकर, माजी नगरसेवक अविनाश दांडेकर, संजय वेटकोळी, गोपाळ चव्हाण, अभिजित कारभारी, अभिजीत चांदोरकर, नंदकुमार आंबेतकर, मनोज पुलेकर, चिदानंद व्हटकर, सतेज निमकर विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. सर्वांनी राष्ट्रगीताचे सामूहिक गायन केले.



(छाया : जितेंद्र जाधव)

# रोहा रेल्वे स्टेशन मार्गावर बसविले दिशाफलक

## सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचा उपक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा रेल्वे स्टेशनकडे जाणार्‍या रस्त्यावर सुराज्य प्रतिष्ठानने दिशादर्शक फलक लावला आहेत. या फलकाचे अनावरण आरपीएफचे अधिकारी जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमासाठी आदर्श गायकवाड यांनी पुढाकार घेतला होता. त्यांना प्रतिष्ठानच्या सदस्यांचे सहकार्य लाभले.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष रोशन चाफेकर, कार्याध्यक्ष मयुर धनावडे, उपाध्यक्ष अभिजित भोसले, सहसचिव विनीत वाकडे, खारापटी अध्यक्ष राहुल पोकळे, प्रिया जंगम, सौरभ भगत, पवन भगत, सोशल मीडिया प्रमुख कुणाल आंबळे, मयूर ढेपे, रजत डवळे, सुमित कडू, प्रियांका कांबळे, प्रणित वानखडे, क्षितिज गोवीलकर, प्रसाद पाटूकले, संकेत देसाई, रिया कासार यांच्यासह इतर सदस्य व नागरिक या वेळी उपस्थित होते.

# पाली पोलिसांची रिले दौड; नागरिकांकडून गावोगावी स्वागत

**पाली : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पाली पोलीस ठाण्याच्या वतीने बुधवारी (दि.१७) ७५ किलोमीटर रिले दौंडचे आयोजन करण्यात आले होते. या दौडमधील सहभागी झालेल्या पोलिसांचे गावागावाजवळ जंगी स्वागत करण्यात आले.

ही अमृत महोत्सवी दौड पाली पोलीस ठाणे येथून बुधवारी ७ वाजता सुरू झाली. सुरुवातीला काही पोलीस झाप गावापर्यंत एकत्र धावले. त्यानंतर एका नंतर एक असे दहा ते बारा पोलिसांनी हातात राष्ट्रध्वज घेऊन ७५ किलोमीटरचे अंतर धावून पूर्ण केले.

पाली पोलीस ठाण्यापासून सुरू झालेली ही दौड झाप, वावळोली, सिद्धेश्वर, पुई, खांडसई, वैतागवाडी, नाडसूर, ठाणाळे, कोंडगाव, नवघर, आसरे, कासारवाडी, हरनेरी, जांभुळपाडा, परळी, नानोसे, वर्‍हाड-जांभुळपाडा, पेडली, तिवरे, चिवे, मजरे जांभुळपाडा, रासळ, आंबोले मार्गे पुन्हा पाली पोलीस ठाण्यात आली. तेथे या दौंडची सांगता भारत माता की जय या जयकाराने करण्यात आली.

दरम्यान, दौडमधील पोलिसांचे गावागावाजवळ स्वागत करण्यात येत होते. ही दौड सुरू करताना पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे, तहसीलदार दिलीप रायण्णावर, गटविकास अधिकारी विजय यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित साबळे यांच्यासह पोलीस कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



# 'शिवरायांची आग्र्याहून सुटका इतिहासातील सर्वांत रोमांचकारी घटना'

**अलिबाग : प्रतिनिधी**

देव, देशासाठी जीव ओवाळून टाकणारी पिढी घडविण्याची ताकद रायगड किल्ल्याच्या मातीत असून, त्या श्रध्देने प्रत्येकाने एकदा तरी किल्ल्यावर जावून तेथील माती आणून देवघरात ठेवावी, असे आवाहन शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी बुधवारी (दि. १७) रायगड जिल्हा परिषदेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित व्याख्यान कार्यक्रमात केले. या वेळी देशमुख यांनी आग्रा दरबारातील प्रसंग कथन करीत सभागृहात रोमांच उभा केला. तसेच महाराजांची आग्र्याहून सुटका ही इतिहासातील सर्वात रोमांचकारी घटना असल्याचे मत व्यक्त केले.



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त रायगड जिल्हा परिषदेच्या ना. ना. पाटील सभागृहात बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित व्याख्यानाचे आयोजन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. या वेळी शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे युद्ध कौशल्य, अंधश्रध्देला न मानणारे शिवाजी महाराज, श्रध्देचा बळावर सरदार व मावळ्यांच्या मनात स्फूर्ती जागृत करणारे शिवाजी महाराज, कितीही मोठे संकट आले तरी न डगमगता संकटांचा सामना करणारे शिवाजी महाराज अशी शिवाजी महाराजांची अनेक व्यक्तीमत्वे सप्रमाण मांडली. याचबरोबर त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचे कार्य कथन केले. शिवाजी महाराजांची स्वराज्य निर्मिती व संभाजी महाराजांचे बलिदान यामुळेच औरंगजेबाला या महाराष्ट्राच्या मातीतच मूठमाती मिळाली, असे शिवव्याख्याते देशमुख सांगितले.

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, महिला व बालविकास उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक, पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, कृषी विकास अधिकारी लक्ष्मण खुरकुटे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम, माध्यमिक शिक्षण विभाग अधिकारी ज्योत्स्ना शिंदे-पवार, प्राथमिक शिक्षण अधिकारी पूनिता गुरव, मुख्य लेखा, वित्त अधिकारी भगवान घाडगे यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# कर्जतमधील शिबिरात ७३ जणांचे रक्तदान

**कर्जत : बातमीदार**

सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान या संस्थेच्या कर्जत विभागाच्या वतीने सोमवारी (दि. १५) शहरातील अंबामाता मंदिरात रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ७३ दात्यांनी रक्तदान केले.

सह्याद्री प्रतिष्ठानचे सुधीर साळोखे, प्रणव जंगम, स्वप्नाली पाटील, सूरज खडे यांच्यासह अनेक सदस्यांनी हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.



# माणगावात ग्रंथ पारायण



**माणगाव : रामप्रहर वृत्त**

जगद्गुरू नरेंद्राचार्याजी महाराज व प. पू. कानिफनाथ महाराज यांच्या कृपाशीर्वादाने दक्षिण रायगड ज़िल्ह्यात श्रावण महिन्याचे आचित्य साधून श्री लिलामृत ग्रंथ पारायण सोहळे आयोजित केले जात आहेत. त्याचा एक भाग म्हणून माणगाव येथील सेवाकेंद्रात मंगळवारी (दि.१६) श्री लिलामृत ग्रंथाचे एक दिवशीय पारायण करण्यात आले.

जगद्गुरू नरेंद्राचार्याजी महाराज संस्थानच्या माणगाव सेवाकेंद्रात मंगळवारी सकाळी १० वाजता श्री स्वामीचा नामगजर व धूपारती करण्यात आली त्यानंतर श्री लिलामृत ग्रंथाच्या पारायणास सुरूवात झाली. सेवा केंद्रामधील १५ साधकांनी पारायण केले, या वेळी ३५ ते ४० भक्तगण उपस्थित होते. संस्थानचे रायगड जिल्हा ज़िल्हा सचिव भरत थीटे आणि प्रसिध्दी प्रमुख जितेंद्र दोशी यांनी या पारायणास भेट दिली.

संस्थानचे ज़िल्हा निरीक्षक सुनील वीर, ज़िल्हाअध्यक्ष सुधीर पुळेकर, ज़िल्हा आधात्मिक प्रमुख प्रवीण मोरे, तालुका अध्यक्ष गुरुनाथ कामत, महिला अध्यक्ष योगिता धाडवे, अंजली जगताप यांनी या पारायणाकरिता मार्गदर्शन व सहकार्य केले. सेवाकेंद्र अध्यक्ष निकिता धाडवे, संतोष पोतदार, युवराज सरडे, प्रकाश मेहता यांनी या पारायणाकरिता विशेष कार्य केले.

# कर्जतमध्ये रिक्षाचालक संदीप रूठेंची माणुसकी

**कर्जत : बातमीदार**

**अनोळख्या आजींना केले नातेवाईकांच्या स्वाधीन**

शहरात रिक्षा स्टँड परिसरात दोन दिवसांपासून एक वयोवृद्ध अनोळखी आजी एकटीच फिरत होती. रिक्षाचालक संदीप रुठे यांनी तीला स्वःताची आजी समजून रसायनी येथे घरी सोडले.

कर्जत तालुक्यामधील बीड गावातील रिक्षाचालक संदीप रुठे हे नेहमीप्रमाणे कर्जत स्टेशन रिक्षा स्टॅन्ड येथे गाडी उभी करून प्रवाशांची वाट पाहत होते. त्या परिसरात एक अनोळखी वयोवृद्ध आजी दोन दिवस फिरत होत्या. त्यांची चौकशी केली असता त्या रसायनी येथील असल्याचे समजले. उपाशी असलेल्या आजींना रुठे यांनी घरातून निघताना सोबत आणलेला जेवणाचा डब्बा दिला. त्यानंतर त्यांना कर्जत पोलीस ठाण्यात नेले. हवालदार संदेश सानप यांना त्या अनोळखी आजींबद्दल माहिती सांगितली. रिक्षचालक रिक्षा चालक रुठे यांनी त्या अनोळखी आजींना आपल्या रिक्षात बसवून विचारपूस केली. आजींच्या नातेवाईकांचा शोध व खात्री करुन घेण्याकरिता रसायनी पोलीस ठाण्यात संपर्क साधला.आणि पोलिसांच्या मदतीने आजींना नातेवाईकांच्या स्वाधीन केले.


## जाहीर नोटीस

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस**

महात्मा फुले को. ऑप. क्रे.सो.लि., पनवेल. या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूद्ध थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमूद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीद्वारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दि. २२/०८/२०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण स्वत: वा आपले प्रतिनिधीमार्फत उपस्थित रहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

| अ.क्र. | दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १५/२०२२-२३ | श्री. गणेश माणिक कावळे (श्री. राधेश्याम बंसतु पाल, कर्जदार यांचे जामिनदार | घर क्र. ७, मोठा खांदा, ता. पनवेल, जि. रायगड. | १,८२,१५६/- |
| २ | १६/२०२२-२३ | श्री. गणेश माणिक कावळे (श्री. इम्रान इब्राहीम दुस्ते, कर्जदार यांचे जामिनदार | घर क्र. ७, मोठा खांदा, ता. पनवेल, जि. रायगड. | २,२८,०५४/- |
| ३ | १७/२०२२-२३ | श्री. जलील अब्दुल कादिर रासलकर (कर्जदार) | पटेल मोहल्ला, हारमोनियम बि-१, १ ला माळा रुम नं. १०, ता. पनवेल, जि. रायगड | २,००,०५०/- |
| | | श्री. गजानन रामचंद्र भगत (जामिनदार) | घर क्र.१२३२, कोळीवाडा, ता.पनवेल, जि.रायगड | |
| | | श्री. शादाफ हुसेनमियाँ रईस (जामिनदार) | मु. नवीन पोसरी, गजानन मंदिराजवळ, पो. मोहोपाडा, ता. खालापूर, जि. रायगड | |
| ४ | १८/२०२२-२३ | श्री. गणेश रघुनाथ भोईर (कर्जदार) | घर क्र.५८ अे, रोडपाली, पो. नावडे, ता. पनवेल, जि. रायगड | २,१०,१८९/- |
| | | श्री. नवनाथ रामदास विधाते (जामिनदार) | एफ नं. आई ३६, ज्ञानेश्वर माऊली हौ.सो., विश्राळी नाका, चाणक्य हॉटेल, विचुंबे ता. पनवेल, जि. रायगड | |
| | | श्री. आनंद महादेव गिड्डे (जामिनदार) | के.एल.२, सेक्टर ६/ई, बिल्डींग नं. ३०, रुम नं. ७, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड | |
| ५ | १९/२०२२-२३ | श्री. नवनाथ रामदास विधाते (कर्जदार) | एफ नं. आई ३६, ज्ञानेश्वर माऊली हौ.सो., विश्राळी नाका, चाणक्य हॉटेल, विचुंबे ता. पनवेल, जि. रायगड | १,७८,३०८/- |
| | | श्री. आनंद महादेव गिड्डे (जामिनदार) | के.एल.२, सेक्टर ६/ई, बिल्डींग नं. ३०, रुम नं. ७, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड | |
| | | श्री. गणेश रघुनाथ भोईर (जामिनदार) | घर क्र.५८ अे, रोडपाली, पो. नावडे, ता. पनवेल, जि. रायगड | |
| ६ | २०/२०२२-२३ | श्री. अमजद महमुद खान (श्री.भिमप्पा मलप्पा कोळी कर्जदार यांचे जामिनदार) | कच्छी मोहल्ला, एम.जी. रोड, रुम क्र. १४, मेस्त्री चाळ, ता. पनवेल, जि. रायगड | १,९७,४०२/- |
| | | श्री. राजु बाबू धोत्रे (श्री.भिमप्पा मलप्पा कोळी कर्जदार यांचे जामिनदार) | विश्राळी नाका, मार्केट यार्ड रोड, झोपडपट्टी नं. टी/११, साई प्रतिक बिल्डींग समोर, ता.पनवेल जि. रायगड | |
| ७ | २२/२०२२-२३ | श्री. ज्ञानदेव आनंद चव्हाण (कर्जदार) | जी/३०३, ज्योर्तिलिंग कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.१४०, डेरवली गाव, ता. पनवेल, जि. रायगड | २,००,७२६/- |
| | | श्री. भास्कर हरिअप्पा सनील (जामिनदार) | कडू बिल्डींग, रुम नं. ८, प्लॉट नं.५२१/१७, बावन्न बंगला, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | |
| ८ | २३/२०२२-२३ | श्री. निवृत्ती मारुती म्हात्रे (कर्जदार) | घर नं. ११७७, खुटारी, पो. तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड | २,०४,७३१/- |
| | | श्री. मुझम्मील ईस्माईल मदार (जामिनदार) | मु. घर नं. ९३४, तळोजा पंचनंद, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड | |
| | | श्री. पिंटू चंद्रकांत राजे (जामिनदार) | घर नं. ३९, तळोजा मजकूर गाव, तळोजा ता. पनवेल, जि. रायगड | |
| ९ | २४/२०२२-२३ | श्री. राजु गणपत सावंत (कर्जदार) | मिश्रा भेलपुरीवाला बिल्डींग, १ला माळा, बंदर रोड, एम्लॉयमेंट ऑफिसच्या समोर, जुने पनवेल, जि. रायगड | १,९४,८१३/- |
| | | श्री. साबीर बशीर शेख (जामिनदार) | घर क्र. ५४२, फरशी तळोजा, ता. पनवेल, जि.रायगड | |

**सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.**
स्थळ : पनवेल.
दिनांक :- १७/०८/२०२२.
जा.क्र. :- १६७३

शिक्का

**सही/-**
**(श्री. बा. ना. वाघमारे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, पनवेल, जि. रायगड.**



## जाहीर नोटीस

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस**

महात्मा फुले को. ऑप. क्रे.सो.लि., पनवेल. या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूद्ध थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमूद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीद्वारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दि. २२/०८/२०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण स्वत: वा आपले प्रतिनिधीमार्फत उपस्थित रहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

| अ.क्र. | दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २५/२०२२-२३ | श्री. गणेश माणिक कावळे (श्री. राधेश्याम बंसतु पाल, कर्जदार यांचे जामिनदार | घर क्र. ७, मोठा खांदा, ता. पनवेल, जि. रायगड. | ३०,३३५/- |
| २ | २६/२०२२-२३ | श्री. राधेश्याम बंसतु पाल (श्री. इम्रान इब्राहीम दुस्ते, कर्जदार यांचे जामिनदार | पुष्प विनायक सोसायटी, बी/६, पी/६०५, गावदेवी मंदिराजवळ, आदई, ता. पनवेल, जि. रायगड. | ७१,२४५/- |
| | | श्री. गणेश माणिक कावळे (श्री. इम्राण इब्राहीम दुस्ते, कर्जदार यांचे जामिनदार | घर क्र. ७, मोठा खांदा, ता. पनवेल, जि. रायगड. | |
| ३ | २७/२०२२-२३ | श्री. जलील अब्दुल कादिर रासलकर (कर्जदार) | पटेल मोहल्ला, हारमोनियम बि-१, १ला माळा रुम नं. १०, ता. पनवेल, जि. रायगड | ३६,४०१/- |
| | | श्री. गजानन रामचंद्र भगत (जामिनदार) | घर क्र.१२३२, कोळीवाडा, ता.पनवेल, जि.रायगड | |
| | | श्री. शादाफ हुसेनमियाँ रईस (जामिनदार) | मु. नवीन पोसरी, गजानन मंदिराजवळ, पो. मोहोपाडा, ता. खालापूर, जि. रायगड | |
| ४ | २८/२०२२-२३ | श्री. गणेश रघुनाथ भोईर (कर्जदार) | घर क्र.५८ अे, रोडपाली, पो. नावडे, ता. पनवेल, जि. रायगड | ५६,२२२/- |
| | | श्री. नवनाथ रामदास विधाते (जामिनदार) | एफ नं. आई ३६, ज्ञानेश्वर माऊली हौ.सो., विश्राळी नाका, चाणक्य हॉटेल, विचुंबे ता. पनवेल, जि. रायगड | |
| | | श्री. आनंद महादेव गिड्डे (जामिनदार) | के.एल.२, सेक्टर ६/ई, बिल्डींग नं. ३०, रुम नं. ७, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड | |
| ५ | २९/२०२२-२३ | श्री. नवनाथ रामदास विधाते (कर्जदार) | एफ नं. आई ३६, ज्ञानेश्वर माऊली हौ.सो., विश्राळी नाका, चाणक्य हॉटेल, विचुंबे ता. पनवेल, जि. रायगड | ४५,७३९/- |
| | | श्री. आनंद महादेव गिड्डे (जामिनदार) | के.एल.२, सेक्टर ६/ई, बिल्डींग नं. ३०, रुम नं. ७, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड | |
| | | श्री. गणेश रघुनाथ भोईर (जामिनदार) | घर क्र.५८ अे, रोडपाली, पो. नावडे, ता. पनवेल, जि. रायगड | |
| ६ | ३०/२०२२-२३ | श्री. अमजद महमुद खान (श्री.भिमप्पा मलप्पा कोळी कर्जदार यांचे जामिनदार) | कच्छी मोहल्ला, एम.जी. रोड, रुम क्र. १४, मेस्त्री चाळ, ता. पनवेल, जि. रायगड | ६६,८३३/- |
| | | श्री. राजु बाबू धोत्रे (श्री.भिमप्पा मलप्पा कोळी कर्जदार यांचे जामिनदार) | विश्राळी नाका, मार्केट यार्ड रोड, झोपडपट्टी नं. टी/११, साई प्रतिक बिल्डींग समोर, ता.पनवेल जि. रायगड | |
| ७ | ३२/२०२२-२३ | श्री. ज्ञानदेव आनंद चव्हाण (कर्जदार) | जी/३०३, ज्योर्तिलिंग कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.१४०, डेरवली गाव, ता. पनवेल, जि. रायगड | ५१,२१४/- |
| | | श्री. भास्कर हरिअप्पा सनील (जामिनदार) | कडू बिल्डींग, रुम नं. ८, प्लॉट नं.५२१/१७, बावन्न बंगला, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | |
| ८ | ३३/२०२२-२३ | श्री. निवृत्ती मारुती म्हात्रे (कर्जदार) | घर नं. ११७७, खुटारी, पो. तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड | ४६,२२१/- |
| | | श्री. मुझम्मील ईस्माईल मदार (जामिनदार) | मु. घर नं. ९३४, तळोजा पंचनंद, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड | |
| | | श्री. पिंटू चंद्रकांत राजे (जामिनदार) | घर नं. ३९, तळोजा मजकूर गाव, तळोजा ता. पनवेल, जि. रायगड | |
| ९ | ३४/२०२२-२३ | श्री. राजु गणपत सावंत (कर्जदार) | मिश्रा भेलपुरीवाला बिल्डींग, १ला माळा, बंदर रोड, एम्लॉयमेंट ऑफिसच्या समोर, जुने पनवेल, जि. रायगड | ७१,७४९/- |
| | | श्री. साबीर बशीर शेख (जामिनदार) | घर क्र. ५४२, फरशी तळोजा, ता. पनवेल, जि.रायगड | |

**सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.**
स्थळ : पनवेल.
दिनांक :- १७/०८/२०२२.
जा.क्र. :- १६७४

शिक्का

**सही/-**
**(श्री. बा. ना. वाघमारे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, पनवेल, जि. रायगड.**

## निवडक

### मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**पनवेल :** येथील नेत्रतज्ञ डॉ. संतोष कुमार नायर यांच्या नायर सुपर स्पेशालिटी आय हॉस्पीटलचा धर्मादाय कक्ष म्हणजेच नवदृष्टी सेवा संस्थेमार्फत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील व्यक्तींकरिता मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यांत आले आहे. यावर्षीच्या स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवा निमित्ताने ७५ मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. हे शिबिर १५ ते २५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत नायर सुपर स्पेशालिटी आय हॉस्पीटल, प्लॉट नं.१४, रोड नं.१६, सिनेराज मिराज सिनेमाजवळ, सेक्टर-११, नवीन पनवेल येथे होणार आहे. तपासणीकरिता येताना रेशन कार्ड व आधारकार्ड घेऊन यावे. अधिक माहिती व नाव नोंदणीकरिता ०२२ २७४५१४४४ / २७४६१४४४ / ८४५४८४४८८८ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### कुकशेतमध्ये उद्या दहीहंडी उत्सव

**नवी मुंबई :** नेरूळ नोडमधील कुकशेत गावात दहीहंडी उत्सवाचा थरार रंगणार असून शुक्रवारी (दि. १९) कुकशेत गावातील गांवदेवी मैदानात या उत्सवाचे आयोजन माजी नगरसेवक सुरज पाटील व सुजाता सुरज पाटील यांनी केले आहे. जय गजानन मित्र मंडळ आयोजित खुल्या गटामध्ये दहीहंडी फोडणाऱ्यास २५ हजार रुपये, पारंपारिक मानाची दहीहंडी फोडणाऱ्यास पाच हजार रुपये, दहीहंडीस सलामी देणाऱ्या पथकांना एक हजार रूपये पारितोषिक देण्यात येणार आहे. या उत्सवामध्ये आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, जयवंत सुतार, भाजपचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, सामाजिक कार्यकर्ते गणेश भगत आदी भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सभोवतालचे रहीवाशी व ग्रामस्थ सहभागी होणार आहेत.



**पनवेल : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ व पनवेल इंडस्ट्रियल को. इस्टेट लि.ने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला. या वेळी इंडस्ट्रियल इस्टेट लि.चे अध्यक्ष विजय लोखंडे, बँक ऑफ महाराष्ट्रचे विशेष सहाय्यक अरविंद मोरे, माजी शाखा प्रबंधक विजयकुमार पाटील, कामगार कल्याण मंडळाचे केंद्र प्रमुख प्रवीण सकट, उद्योजक प्रफुल धारगळकर, सुनील सूचक, गौरव जोशी, जसवंत सिंग, डी. डी. सावंत, शोभा पाटील, श्रीवास्तव, श्रीमती मोरे आदी उपस्थित होते.**

# नवी मुंबईत कचरा वर्गीकरणाला प्राधान्य

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महापालिकेतर्फे निर्णय

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना नवी मुंबईकर नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उत्साहात सहभाग घेऊन घरोघरी तिरंगा फडकविला, विविध उपक्रम राबविले. हीच राष्ट्रप्रेमाची भावना यापुढील काळातही तशीच कायम राहील हा विश्वास व्यक्त करीत महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी स्वच्छ व सुंदर शहर ही नवी मुंबईची सर्वदूर ओळख आहे, ती कायम राखण्यासाठी नागरिकांनी घरातूनच कचऱ्याचे ओला, सुका आणि घरगुती घातक अशा तीन प्रकारे वर्गीकरण करण्याचा ठाम निश्चय केला पाहिजे, तशी शपथ घेतली पाहिजे व ही दैनंदिन सवय लावून घेतली पाहिजे, असे आवाहन नागरिकांना केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त नमुंमपा मुख्यालयात आयोजित 'अमृत सोहळा स्वातंत्र्याचा' या विशेष कार्यक्रमाप्रसंगी त्यांनी नागरिकांशी सुसंवाद साधला. या वेळी अतिरिक्त आयुक्त संजय काकडे व सुजाता ढोले आणि इतर अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. फेसबुक आणि यू ट्युब लाईव्ह वरून अनेक नागरिकांनी या कार्यक्रमाचा ऑनलाईन अनुभव घेतला.

### स्वच्छ मंथन स्पर्धा उत्साहात

*स्वच्छ मंथन स्पर्धेच्या निमित्ताने स्पर्धात्मक चुरशीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले, तसेच स्वयंसेवी संस्था, नागरिक यांचा चांगला सहभाग लाभला याचा विशेष उल्लेख आयुक्तांनी केला. यामध्ये १०० टक्के वर्गीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्यात आल्याचे नमूद करीत यामध्ये सोसायट्यांनी कचरा वर्गीकरणाची गरज समजून पुढाकार घेतला पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका आयुक्तांनी मांडली. महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयांनी या अनुषंगाने असे काही इतरांपेक्षा अनोखे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावेत ज्याचे अनुकरण इतरांनी केले पाहिजे, अशी अपेक्षा आयुक्त अभिजित बांगर यांनी व्यक्त केली.*

कोणतेही अभियान यशस्वी करण्यात नवी मुंबईकर नागरिक आघाडीवर असतात म्हणूनच स्वच्छतेची एवढी मानांकने आपण मिळवू शकलो असे सांगतानाच 'निश्चय केला, नंबर पहिला' हे आपले उद्दिष्ट गाठण्यासाठी नागरिकांचा स्वच्छतेप्रती संपूर्ण व सक्रिय सहभाग मिळणे गरजेचे असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.



स्वच्छेतबाबत सोसायट्यांनी अधिक जागरूक राहून दैनंदिन कचऱ्याचे तीन प्रकारे वर्गीकरण झाल्याशिवाय कचरा सोसायटीबाहेर जाणार नाही, अशी व्यवस्था निर्माण करावी असे सूचित करतानाच स्वच्छतेविषयी टिकाटिप्पणी करताना त्या व्यक्ती अथवा संस्थेने कचरा वर्गीकरणाबाबत आपण स्वत: किती कृतीशील आहोत असा प्रश्न स्वत:ला; विचारावा असे आयुक्तांनी सांगितले. कचरा वर्गीकरण ही घनकचरा व्यवस्थापनातील सर्वात महत्वाची बाब असून स्वच्छता ही नियमित करण्याची गोष्ट असल्याने माझ्याकडून १०० टक्के वर्गीकरण झालेच पाहिजे असा निश्चय प्रत्येकाने आजच्या स्वातंत्र्यदिनी करावा असे आयुक्तांनी नागरिकांना आवाहन केले.

पंतप्रधानांनी स्वच्छता अभियान वॉर्ड पातळीवर राबविले जावे या व्यक्त केलेल्या अपेक्षेची अंमलबजावणी नवी मुंबई पालिकेमार्फत मागील वर्षीपासूनच सुरू केली असून यावर्षी त्या विभाग पातळीवरील स्पर्धेला अधिक सुनियोजित रूप दिले असल्याची माहिती त्यांनी दिली. या स्पर्धेला आपण 'स्वच्छ मंथन' असे नाव दिले असून यामधून विभागाविभागांमध्ये स्वच्छताविषयक अधिक चांगले काम करण्याची निकोप स्पर्धा होईल आणि याचा एकत्रित परिणाम शहर स्वच्छतेची गुणवत्ता उंचावण्यावर होईल, असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला.

## आमदार मंदा म्हात्रे यांची तिरंगा रॅली

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त सीबीडी बेलापूर ते सानपाडा पामबीच मार्गावर आयोजित केलेल्या तिरंगा यात्रेला हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भारताच्या राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊन यात्रेला सुरुवात करण्यात आली.



भाजपा कार्यकर्ते व तरुण युवकांच्या शेकडो दुचाकी व चार चाकी वाहने तसेच नवी मुंबई ॲम्ब्युलन्स सेवा संस्थेच्या १३ अँब्युलन्स तिरंगा झेंडा घेऊन तिरंगा यात्रेत सहभागी झाली होती.

या वेळी भाजपा जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, महामंत्री विजय घाटे, सभागृह नेते रविंद्र इथापे, माजी सभापती संपत शेवाळे, डॉ. जयाजी नाथ, नेत्रा शिर्के, साबु डॅनियल, शुभांगी पाटील, अशोक गुरखे, शिल्पा कांबळी, विशाल डोळस, दीपक पवार, सुनील पाटील, गोपाळ गायकवाड, बेलापूर विधानसभा संयोजक- भाजपा महामंत्री निलेश म्हात्रे, डॉ. दीपक बैद, जगन्नाथ जगताप, रवी म्हात्रे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे, सुहासिनी नायडू, जयश्री चित्रे, शशी भानुशाली, भरत जाधव, पांडुरंग आमले, जनार्दन सुतार तसेच असंख्य ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुण वर्ग उपस्थित होते.

## कोकण भवनात समूह राष्ट्रगीत गायन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राबविण्यात येणाऱ्या स्वराज्य महोत्सव या उपक्रमांतर्गत बुधवारी (दि. १७) कोकण भवनात उप आयुक्त मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली समूह राष्ट्रगीत गायन करण्यात आले.



या वेळी उपआयुक्त (महसूल) मकरंद देशमूख, उपायुक्त (पुरवठा) रवि पाटील, उपायुक्त (रोहयो) वैशाली राज चव्हाण (निर्धार), उपायुक्त (करमणूक) सोनाली मुळे, उपायुक्त (वस्तू व सेवा कर) कमलेश नागरे, कोंकण विभाग नगररचनाचे सहसंचालक जितेंद्र भोपळे, कोंकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश धुमाळ तसेच विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शासन निर्णयात दिलेल्या सूचनेनूसार कोंकण भवन इमारतीत असलेल्या सर्व कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोकण भवन इमारतीच्या प्रांगणातील ध्वजस्तंभाजवळ उपस्थित राहून समूह राष्ट्रगीत गायन केले.



## लिमये वाचनालयातर्फे राष्ट्रध्वजाला मानवंदना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयात सोमवारी (दि. १५) ७५वा अमृतमहोत्सवानिमित्त पनवेलचे सुप्रसिद्ध कवी, गझलकार, लेखक ए. के. शेख यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात येऊन राष्ट्रध्वजाला मानवंदना देणेत आली.

या कार्यक्रमाकरीता प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध कवी, लेखक, संपादक रोहिदास पोटे माजी शिक्षण अधिकारी हे उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष श्याम वालावलकर, कार्याध्यक्ष विनायक वत्सराज, कार्यवाह काशिनाथ जाधव, सह कार्यवाह जयश्री शेट्ये, प्रशांत राजे, ॲड. माधुरी थळकर, हिमालिनी कुलकर्णी, सुनील खेडेकर, रमेश चव्हाण, श्रुती वीरकर, राजेंद्र शेट्ये, धनसे शाहीद सौ. राजे, स्मिता पाटील ग्रंथपाल निकेता शिंदे, शारदा कदम, स्नेहल चौगुले, संजय दिवटे आदी उपस्थित होते.

या वेळी ए. के. शेख यांनी आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आत्तापर्यंतच्या सुवर्णमयी आठवणींना उजाळा देऊन स्वरचित उत्साहपर राष्टगौरव गीत गाऊन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

## विजय आर्मी स्कूलमध्ये ध्वजारोहण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने विजय आर्मी स्कूल व ज्युनिअर कॉलेज चिखले येथे सकाळी ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला.



या वेळी विद्यालयाचे प्राचार्य एम. के. मराठे अध्यक्षस्थानी होते, तर प्रमुख अतिथी म्हणून कमांडट एस. के. जाना, एस. एस. जाना, सामाजिक कार्यकर्त्या रेखा माल्या, स्कूलचे कमांडट पी. व्ही. आर कृष्णन, तसेच कृष्णन व बँक ऑफ बडोदाच्या सिल्क स्मिता व त्यांची टीम, पालकवर्ग, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते. कमांडट पी. व्ही. आर कृष्णन यांच्या हस्ते ध्वजपूजन व ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला.

सूत्रसंचलन जयश्री पवार यांनी केले, तर प्रास्ताविक एस. बी. पवार यांनी केले. उपस्थितांचे आभार उपप्राचार्य एस. पी. पाटील यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## चिंध्रणमध्ये अखंड हरिनाम सप्ताह

### भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची उपस्थिती






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिंध्रण ग्रामस्थ मंडळाच्या सौजन्याने आणि श्री विठ्ठल प्रासादिक भजन मंडळाच्या सहकार्याने श्री ज्ञानेश्वरी सामुदायीक पारायण या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. चिंध्रण गावातील श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात आयोजित या सोहळयाला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी बुधवारी (दि. १७) भेट देत दर्शन घेतले.

अखंड हरिनाम सप्ताहाचे यंदाचे हे ४६वे वर्ष आहे. १२ ते १९ ऑगस्ट दरम्यान हा सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. या सप्ताहाला भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले.

या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप नेते एकनाथ देशेकर, चिंध्रण ग्रामपंचायतीच्या सरपंच कमला देशेकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि वारकरी उपस्थित होते.

## गोविंदा पथकांना सानपाड्यातील सोन्याच्या दहीहंडीचे आकर्षण



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

सानपाडा येथील युवा नेते पांडुरंग आमले यांनी दहीहंडी फोडणाऱ्या पथकाला सुमारे सव्वा तीन लाख रुपये किमतीची सोन्याची हंडी पारितोषिक ठेवल्याने मुंबई, ठाणेम, कल्याण-डोंबिवली, उरण-पनवेल तसेच स्थानिक नवी मुंबई परिसरातील गोविंदा पथकांमध्ये ही दहीहंडी फोडण्यासाठी स्पर्धा निर्माण होणार असल्याची चर्चा नवी मुंबईत सुरू आहे.



सानपाडा सेक्टर ८ मधील पोलीस स्टेशनच्या मागील बाजूस असलेल्या हुतात्मा बाबू गेनू मैदानावर शुक्रवारी सकाळी १० ते रात्री १० या वेळेत हा दहीहंडी उत्सव रंगणार आहे. सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग आमले, भाजप प्रभाग क्रमांक ३०, साईभक्त सेवा मंडळाच्या वतीने या दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दहीहंडी फोडणाऱ्या पथकाला सोन्याची हंडी देण्यात येणार असून सलामी देणाऱ्या पथकांनाही रोख पारितोषिकांनी गौरविण्यात येणार आहे. सात थरांची सलामी देणाऱ्या पथकाला ट्रॉफी, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय मुंबई, नवी मुंबईतील नऊ गोविंदा पथकांसाठी मानाच्या अशा विशेष दहीहंडीचे आयोजन या कार्यक्रमादरम्यान केले आहे.

या कार्यक्रमात पाच अपंग विद्यार्थ्यांना सायकली भेट देवून त्यांचे पालकत्व पांडुरंग आमले या वेळी स्विकारणार आहेत. या कार्यक्रमात भाजपच्या स्थानिक आमदार मंदा म्हात्रे, नवी मुंबई भाजपचे जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, महामंत्री निलेश म्हात्रे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत. रमेश शेटे, आज्ञा गव्हाणे, विश्वास कणसे, मंगल वाव्हळ, संचिता जोईल, प्रतिभा पवार, रुपेश मढवी, अशोक विधाते, श्रीपाद पत्की, प्रथमेश माने, विनायक काबुगडे, कैलास दळवी हे दहीहंडी उत्सवाच्या आयोजनात मेहनत घेत आहेत.

## रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

**पनवेल : वार्ताहर**

रिक्षात राहिलेली बॅग परत करून बन्सीलाल भामरे या रिक्षा चालकाने एक नवा आदर्श समोर आणला आहे.



एम एल धानेकर कॉलेज मुंबई येथे शिकणारी विद्यार्थिनी रितिका रमेश कांबळे ही खारघर येथील राहणाऱ्या चुलत भावाकडे आली होती. रितिकाने खारघर सेक्टर १० ते सेंट्रल पार्क गार्डन असा प्रवास बन्सीलाल यांच्या रिक्षाने केला. ज्या ठिकाणी जायचे होते, तेथे उतरल्यानंतर आपली बॅग जवळ नसल्याचे रितिका यांच्या लक्षात आले. मात्र, तो पर्यंत रिक्षा निघून गेली होती. रिक्षात राहिलेल्या बॅगमध्ये काही महत्त्वाची कागदपत्रे, पावत्या, परीक्षेत बसण्याकरता लागणारे हॉल तिकीट आणि रोख रक्कम होती. रिक्षात बॅग राहिल्याचे लक्षात आल्यानंतर बन्सीलाल यांनी बॅगमधील ओळखपत्र बघितले व त्यांनी खारघर एकता रिक्षा संघटनेचे उपध्यक्ष जयेंद्र कोळी यांना फोन केला.

कोळी यांनी ती बॅग खारघर पोलीस ठाण्यात जाऊन देण्याचा सल्ला रिक्षाचालक बन्सीलाल यांना दिला. बन्सीलाल यांनी खारघर पोलीस ठाण्यात धाव घेता. रिक्षा प्रवासी रितिका कांबळे तेथे उपस्थित होत्या. इन्स्पेक्टर विमल बिडवे, किरण पाटील, संतोष पिलाने, विशाल बोरसे यांच्या उपस्थितीत रिक्षाचालकाने रितिका हिला बॅग सोपवली. पैसे व महत्त्वाची कागदपत्रे घेऊन आलेल्या बन्सीलाल यांना रितिका यांनी बक्षिशी देऊ केली. मात्र, बन्सीलाल यांनी ती नम्रपणे नाकारली.

राम प्रहर

## श्रावणधारा

### मिरींग

**सोसाटयाचा वारा, न काले काले ढग**
**बरसत खलाटीन समदे आलाय मिरगं**

**निगोंल्या गलतान अंगनात पानी**
**बाधोली बांधतान तये रंगून कोनी**

**भिजली शेता, न रूजलीन भाता**
**राबाला आली तरारी लावणी होता**

**भरलीन तली, भरल्यान बावी**
**बेडूक हलदुला, गातय ओवी**

**धरणीमाता नेसलीय शालू हिरवा**
**सरवन न भादवा आला हंडया घोधवा**

**मिरीगाच पानी कोसळू दे मळयात**
**पिकू दे खलाटी न लक्ष्मी खळ्यात**



**-डॉ. अविनाश पाटील**
नवीन पनवेल (९८६९०५१३३७)

# खोपोली-खालापूर मार्गावरील खड्डे खालापूर पोलिसांनी भरले

**खालापूर : प्रतिनिधी**

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सदैव तत्पर असणारी खाकी वर्दी बुधवारी (दि. १७) प्रवाशांच्या सेवेसाठी चक्क रस्त्यावर उतरली होती. हातात दंडूक्याऐवजी घमेली आणि फावडे घेऊन खोपोली-खालापूर मार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी खालापूर पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी श्रमदान केले.

खालापूर तालुक्यातील अतिशय दुरवस्था झालेला रस्ता म्हणजे जुना मुंबई-पुणे महामार्ग आहे. या महामार्गाच्या खालापूर ते खोपोली फाटा या सात किलोमीटर लांबीच्या टप्प्याचे चौपदरीकरणाचे काम २०१७मध्ये सुरू झाले होते. मात्र ठेकेदाराने दर्जा न राखता हे काम कसेबसे काम पूर्ण केले आहे. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात त रस्त्याची प्रचंड दुरावस्था होते.सध्यादेखील या रस्त्याची प्रचंड दूरावस्था झाली असून छोटे-मोठे अपघात घडत आहेत.


(छाया : अरुण नलावडे)

वास्तविक या रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीचे काम एमएसआरडीसीचे आहे. गणेशोत्सव तोंडावर आल्यामुळे या मार्गावर वाहतुकीचा ताण अधिक जाणवू लागला असून, सणासुदीला विघ्न नको म्हणून या रस्त्याची दुरुस्ती करण्याकरिता चक्क खालापूर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी सरसावले आहेत. पोलीस निरीक्षक बाळा रघुनाथ कुंभार, हवालदार नितिन शेडगे, रमेश उघडा, महिला पोलीस नाईक सोनम शेळके, लतिका गुरव, पोलीस शिपाई समिर पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बुधवारी खड्डे बुजवण्याचे काम हाती घेतले. श्रमदान करून त्यांनी या रस्त्यावरील खड्डे बुजविले.

# पेणमध्ये तिरंगा रॅलीला लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पेणमधील पत्रकार व महात्मा गांधी स्मारक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या तिरंगा रॅलीत सर्व राजकीय पक्ष व विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पेण शहरातील गांधी वाचनालयापासून निघाली ही तिरंगा रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक, महावीर मार्ग, राजू पोटे मार्ग, एसटी स्थानक मार्गे नगर परिषद चौकात आली तेथे या रॅलीचा समारोप करण्यात आला. भारत माता की जय, जय जवान जय किसान, भारतीय स्वातंत्र्याचा विजय असो, भारताचे संविधान भारताचे अभिमान अशा विविध घोषणा या तिरंगा रॅलीत देण्यात आल्या.


(छाया : अनिस मनियार)

# खालापूर तालुका प्लास्टिक कॅरी बॅगमुक्त करण्याचा संकल्प

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त खालापूर तहसील कार्यालय व सहज सेवा फाउंडेशन यांच्या कापडी पिशव्या उपलब्ध करून देण्याच्या संकल्प प्रयोगाचा शुभारंभ सोमवारी (दि. १५) खालापुरातील सरनौबत नेताजी पालकर सभागृहात कर्जतचे उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांच्या हस्ते करण्यात आला.


(छाया : विनायक माडप)

प्रायोगिक तत्त्वावर सुरू होत असलेला कापडी पिशव्या उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम भविष्यात मैलाचा दगड ठरेल. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन आपला तालुका प्लास्टिक कॅरी बॅगमुक्त करण्याच्या दिशेने पाऊल उचलून आझादीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील नवीन संकल्प यशस्वी करावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी नैराळे यांनी या वेळी केले.

प्रशासकीय अधिकारी व व्यापारी असोसिएशन यांच्या सहकार्याने तसेच एनजीओ व नागरिक यांच्यामार्फत हा उपक्रम प्रायोगिक तत्त्वावर खालापूर तालुक्यात राबविण्यात येणार असून या उपक्रमाचे महत्त्व समजून घेऊन नागरिक नक्कीच या उपक्रमास भरभरून प्रतिसाद देतील, असा विश्वास तहसीलदार आयुब तांबोळी यांनी व्यक्त केला.

### कापडी पिशव्या उपलब्ध करून देण्याचा उपक्रम

खालापूर तहसील कार्यालय व सहज सेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील दुकानांमध्ये कापडी पिशव्या पुरवल्या जातील. ग्राहक संबंधित दुकानदाराकडून डिपॉझिट तत्त्वावर अल्प दरात कापडी बॅग घेऊ शकतात व वापरानंतर तीच बॅग पुन्हा तालुक्यातील कलेक्शन सेंटरमध्ये परत देऊ शकतात. यातून दुकानदारा मार्फत होणारा प्लास्टिकच्या कॅरी बॅगचा वापर कमी होईल तसेच घरून बॅग न आणल्यास अथवा बॅग हवी असल्यास गिऱ्हाईकावरसुद्धा कुठल्याही प्रकारचा बोजा पडू नये अशा प्रकारची ही संकल्पना आहे.

खालापूरचे नायब तहसीलदार राजश्री जोगी, पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, खोपोलीचे माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, माजी नगरसेवक राजेंद्र फक्के, साजगाव विभागाचे तलाठी भरत सावंत, उद्योजक हरीश काळे, उद्योजक राजेश पाटील यांच्यासह तहसील कार्यालय व पोलीस ठाण्याचे कर्मचारी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकी भालेराव यांनी केले.

या वेळी उपविभागीय अधिकारी नैराळे यांच्या हस्ते सेल्फी पॉइंटचे उद्घाटन करण्यात आले.तहसील कार्यालय व सहज सेवा फाउंडेशनने खालापूर तहसील कार्यलय परिसरात स्वतंत्र भारताचे पंतप्रधान व राष्ट्रपती यांच्या माहितीचे बॅनर्स उभारले आहेत. त्याचे अजित नैराळे व नागरिकांनी भरभरून कौतुक केले. विशाल उशिरे यांनी आभार मानले.

कापडी पिशव्या उपलब्ध करून देण्याचा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सहज सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी, उपाध्यक्षा इशीका शेलार, सचिव वर्षा मोरे, खजिनदार संतोष गायकर, महिला संघटक नीलम पाटील, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुळकर्णी, आयुब खान आदि परिश्रम घेत आहेत.

# कर्जतमध्ये 'एक शाम देशभक्ती के नाम'


(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

स्वातंत्र्य दिनाच्या ७५व्या वर्धापन दिनानिमित्त कर्जत नगर परिषद, रोटरी क्लब आणि कराओके क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने नगर परिषद सभागृहामध्ये एक शाम देशभक्ती के नाम हा देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते भारतमातेचे पूजन करून या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

प्रथम तुला वंदितो हे गणेशस्तवन सादर करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. जहाँ डाल डालपर सोने..., सत्यम शिवमं सुंदरमं.., कर चले हम फिदा..., ये देश विर जवानों का..., नन्हा मुन्ना राही हूँ..., छोडो कल की बाते..., संदेसे आते है...., मेरा मुल्क..., जय जय महाराष्ट्र माझा..., ए मेरे वतन के लोगो.... ने मजशी ने परत मातृभूमीला..., शूर आम्ही सरदार आम्हाला..., दिल दिया है जान भी देंगे..., अशी देशभक्तीपर गीते रवींद्र लाड, गौतम वैद्य, प्रतिमा भालोदकर, रमाकांत जाधव, संजय वाघमारे, नम्रता देवरे, हमीद खैराट, राम देवरे, प्रसाद जोशी यांनी कराओकेवर सादर केली. नगरसेवक उमेश गायकवाड, राहुल डाळींबकर, रोटरी क्लब सदस्य सचिन ओसवाल, जितेंद्र ओसवाल यांनीही गीते गाऊन स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्यांना आदरांजली वाहिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र लाड यांनी केले. नगरसेवक बळवंत घुमरे, संकेत भासे, हेमंत ठाणगे, नगरसेविका संचिता पाटील, स्वामिनी मांजरे, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, माजी नगरसेवक संतोष पाटील, मुकेश पाटील, रोटरी क्लबचे सतिश श्रीखंडे, विशाल शहा, अरविंद जैन, दिपचंद जैन, डॉ. प्रेमचंद जैन, सुनिल सोनी, डॉ. आदित्य जंगम, योगेश राठी, सुशांत ठकेकर, कराओके क्लबचे अध्यक्ष संजय वाघमारे आदी उपस्थित होते.

# खोपोलीत आरोग्य कर्मचारी, कोरोना योद्ध्यांचा सन्मान

## तब्बल ७०० जणांचे शिबिरात रक्तदान

**खोपोली : प्रतिनिधी**

बुऽऽज् हास्य क्लबचे संस्थापक बाबूभाई ओसवाल यांच्या संकल्पेनूत स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला खोपोलीतील लोहाणा समाज सभागृहात घंटागाडी कामगारांचा तसेच कोरोना योद्ध्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच या वेळी आयोजित केलेल्या शिबिरात सुमारे १०० दात्यांनी रक्तदान केले.



कोरोना बाधितांना उपचारासाठी मदतकार्य करणाऱ्या तात्कालिन नगराध्यक्षा सुमन औसरमल, माजी नगरसेवक मोहन औसरमल, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजीक संस्थेचे गुरूनाथ साठेलकर, सहज फाउंडेशनचे शेखर जांभळे, नगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. संगिता वानखेडे यांच्यासह नगरपालिकेच्या घंटागाडीवर काम करणाऱ्या कामगारांना या वेळी कोरोना योध्दा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

बुऽऽज् हास्य क्लब आणि समर्पण रक्तपेढी-मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने या वेळी रक्तदान शिबिर घेण्यात आले. त्यात १०० दात्यांनी रक्तदान केले. आमदार महेंद्र थोरवे, हभप रामदास पाटील महाराज, दीपेंद्रसिंह बधोरिया, माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसूरकर, सुनील पाटील, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, माजी नगरसेवक मनिष यादव, भाजप शहर अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, अतुल पाटील, उद्योजक हरीष काळे, अबूशेठ जळगावकर, बुऽऽज् हास्य क्लबचे अध्यक्ष संस्थापक बाबूभाई ओसवाल, अध्यक्ष कुलवन सिंग, सदस्य हेमंत नांदे, जयमाला पाटील, विनायक तेलवणे, भास्कर लांडगे, चंद्रकांत केदारी यांच्यासह सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# कर्जतमध्ये महिला बचत गटांनी बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन

**कर्जत : बातमीदार**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त कर्जत पंचायत समिती आणि तालुका बचत गट समन्वय समिती यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने कडाव आणि नेरळ येथे महिला स्वयंसहाय्यता बचत गटांनी बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. तालुक्यातील ६१ बचत गटांनी या प्रदर्शनात स्टॉल लावले होते.




(छाया : संतोष पेरणे)

नेरळ येथील बापूराव धारप सभागृहात तहसीलदार विक्रम देशमुख आणि गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. नेरळ सरपंच उषा पारधी, पंचायत समितीच्या बचत गट ग्रामीण जीवनज्योती अभियान समन्वयक ललिता तेलवणे, ग्रामपंचायत विस्तार अधिकारी उज्ज्वला भोसले यांच्यासह बचत गटांच्या सीआरपी प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते. या प्रदर्शनात तब्बल ४६ महिला बचत गटांचे स्टॉल लावण्यात आले होते. त्यात मसाल्याचे पदार्थ, साठवणीचे पदार्थ, कुरडई, पापड, लोणची, हातमाग वस्त्र, चामड्याच्या चपला आदींसह खाद्य पदार्थांचा समावेश होता. आदिवासी महिला बचत गटाने या प्रदर्शनात रानभाज्यांचे स्टॉल लावले होते,

कडाव येथील बाल दिगंबर मंदिरात आयोजित केलेल्या प्रदर्शनात १६ स्टॉल लावण्यात आले होते. या दोन्ही प्रदर्शनस्थळी आमदार महेंद्र थोरवे यांनी भेटी दिल्या.

# तळाशेत येथील मंदिराचे लोकार्पण

**माणगाव : प्रतिनिधी**

संत नामदेव हे पहिले राष्ट्रीय संत असून त्यांनी संपूर्ण देश जोडण्याचे काम केले. आपला पुनर्जन्मावर विश्वास नसून, या जन्माचे सोने करण्याचे काम प्रत्येकाने केले पाहिजे, असे प्रतिपादन प्रसिध्द साहित्यीक माजी आमदार रामदास फुटाणे यांनी माणगाव तालुक्यातील तळाशेत येथे केले.


(छाया : सलीम शेख)

भाजपचे तालुका अध्यक्ष आप्पा ढवळे यांनी आपल्या कमाईतून माणगाव तालुक्यातील तळाशेत येथे श्री विठ्ठल रखुमाई, संत नामदेव व दत्त मंदिर उभारले आहे. या मंदिराचा लोकार्पण सोहळा रायगड जिल्हा शिंपी समाज महासंघ व श्री संत नामदेव शिंपी समाज तळाशेत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी रामदास फुटाणे बोलत होते. आपल्या भाषणात त्यांनी संजयआप्पा ढवळे यांच्या सामाजिक कार्याचे विशेष कौतुक केले.

संत नामदेव महाराजांनी समाज प्रबोधनासारखे चांगले कार्य केले. त्यांचा आदर्श नजरेसमोर ठेवून आपण सर्वांनी एकसंघ होऊन समाजाची उन्नती साधू या, असे आवाहन शिंपी समाज महासंघाचे जिल्हाध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार पुरुषोत्तम मुळे यांनी या वेळी केले. या कार्यक्रमात समाजातील गुणवंत विद्यार्थी व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत बारटक्के यांनी केले. मंदिर देवस्थानचे अध्यक्ष मेघनाथ सातपुते, उपाध्यक्ष संजयआप्पा ढवळे, द्वारकानाथ ढवळे, तळाचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, भाजपच्या तालुका उपाध्यक्षा यशोधरा गोडबोले, महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्षा अश्विनी महाडिक, तसेच चिन्मय मोने, अनिल नवगणे, दत्तात्रेय पांढरकामे, अरुण करंबे, अशोक सातपुते, राजेश मेहता, नितीन दसवते, प्रभाकर पतंगे, हेमंत बारटक्के, जयकिरण बारटक्के, श्रीकांत खटारे, लहू लुष्टे, काका नवगणे, तुकाराम शेलार, बाबुराव चव्हाण आदींसह ढवळे कुटुंबीय, शिंपी समाजाचे पदाधिकारी व सदस्य, आणि पंचक्रोशीतील भाविक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेघना सातपुते यांनी आभार मानले.

# पोलादपुरात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

सुवर्णकार आणि कारागिर संघटनेने सोनार समाजाचे नेतृत्व करून विविध घटकांना प्रोत्साहित करण्यासोबतच स्वतःचे व्यवसायदेखील सचोटीने चालविण्याची गरज आहे, असे मत ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांनी पोलादपूर येथे केले.

सुवर्णकार व कारागिर संघटनेतर्फे पोलादपूर येथील ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहामध्ये विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात पालकर बोलत होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज आणि संतशिरोमणी नरहरी सोनार महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. संगिता पालकर-हत्तीमारे यांनी स्पर्धा परिक्षांसंबंधात माहिती दिली. माजी उपसरपंच मंगेश नगरकर, सूर्यकांत नगरकर यांनी मनोगत व्यक्त केले. सुप्रीत पालकर, अनुराग पालकर, प्राजक्ता पालकर, कोमल पालकर, आदिती नगरकर या गुणवंत विद्यार्थ्यांना या वेळी मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी सागवेकर यांनी केले. संघटनेचे अध्यक्ष संजय वि. पालकर, सेवानिवृत्त कॅनरा बँक मॅनेजर प्रभाकर पालकर, दापोली कृषी विद्यापिठाचे सेवानिवृत्त अधिकारी सुर्यकांत नगरकर, सामाजिक कार्यकर्ते विजय पालकर, रवींद्र नगरकर यांच्यासह सुवर्णकार समाज बांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपक पालकर, शेखर पालकर तसेच अन्य पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले. चंद्रकांत नगरकर यांनी आभार मानले.

## भारत-झिम्बाब्वे वनडे मालिका

# आज पहिला सामना

**हरारे : वृत्तसंस्था**

केएल राहुलच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघ झिम्बाब्वे दौऱ्यावर दाखल झाला आहे. तीन वन डे सामन्यांची मालिका गुरुवार (दि. १८)पासून सुरू होत आहे. आशिया चषक स्पर्धेआधी ही मालिका टीम इंडियासाठी महत्त्वाची आहे.

अनुभवी फलंदाज राहुलला भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) वैद्यकीय पथकाने तंदुरुस्त जाहीर केल्यानंतर आगामी झिम्बाब्वे दौऱ्यासाठी त्याची भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली. झिम्बाब्वेमध्ये होणाऱ्या तीन सामन्यांच्या (१८, २०, २२ ऑगस्ट) एकदिवसीय मालिकेसाठी आधी शिखर धवनकडे भारतीय संघाचे नेतृत्व सोपविण्यात आले होते, पण राहुलकडे कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आल्याने धवन उपकर्णधारपद सांभाळेल.

दुसरीकडे नियमित कर्णधार क्रेग एर्व्हाइन पायाच्या दुखापतीमुळे भारताविरुद्ध एकदिवसीय मालिकेसाठी मुकणार असून यष्टीरक्षक-फलंदाज रेगिस चकब्वा झिम्बाब्वेचे नेतृत्व करेल.



**भारतीय संघ :** केएल राहुल (कर्णधार), शिखर धवन, ऋतुराज गायकवाड, शुभमन गिल, दीपक हुडा, राहुल त्रिपाठी, इशान किशन (यष्टीरक्षक), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), शार्दूल ठाकूर, कुलदीप यादव, अक्षर पटेल, आवेश खान, प्रसिध कृष्णा, मोहम्मद सिराज, दीपक चहर, शाहबाज अहमद.

**झिम्बाब्वे संघ :** रेगिस चकाब्वा (कर्णधार), रायन बर्ल, तनाका चिवांगा, ब्रॅडली इव्हन्स, ल्यूक जोंगवे, इनोसंट काया, टी. कैटानो, क्लाइव्ह मडांडे, वेस्ली मधेवेरे, तादिवानाशे मारुमनी, जॉन मसारा, टोनी मुन्योंगा, रिचर्ड एन्गरावा, व्हिक्टर एनयाउची, सिकंदर रझा, मिल्टन शुम्बा, डोनाल्ड टिरिपानो.

### सुंदरच्या जागी शाहबाज



झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेला सुरुवात होण्यापूर्वीच संघात समावेश झालेला वॉशिंग्टन सुंदर जखमी झाला आहे. त्यामुळे तो मालिकेत खेळू शकणार नाही. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सुंदरच्या जागी अष्टपैलू शाहबाज अहमदचा संघात समावेश केला आहे. इंडियन प्रीमियर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळणाऱ्या शाहबाजला पहिल्यांदाच भारतीय संघात स्थान मिळाले आहे. २७ वर्षीय शाहबाज अहमदने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ४७.२८ सरासरीने धावा केल्या आहेत, तर त्याची गोलंदाजी सरासरी ३९.२० इतकी आहे.



## रायगडच्या कराटेपटूंकडून राष्ट्रीय स्पर्धेत पदकांची लयलूट

**उरण : बातमीदार**

कर्नाटकमधील बंगळुरू येथे झालेल्या ३४व्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी विविध वजनी गटात कुमिते व काता प्रकारात पदके पटकाविली. या स्पर्धेत विविध १७ राज्यांतील ३५० खेळाडूंनी सहभाग घेतला.

यामध्ये अमिता घरत, विनया पाटील, शुभम ठाकूर, श्रेय मोकल, श्रेयस वटाणे दोन सुवर्ण, अमिषा घरत, आर्वी केदारी, समीक्षा पाटील, आकाश भिडे, ऋग्वेद जेधे एक सुवर्ण व रौप्य, कार्तिकी पाटील, नेत्रा गावंड, हंसिका मोकल एक सुवर्ण व कांस्य, रोहित घरत, हर्षा ठाकूर सुवर्ण, ऋतुजा ठाकूर, मानसी ठाकूर, वैदही घरत, मनस्वी पवार हिने एक रौप्य व कांस्यपदक जिंकले.

यापैकी अमिता, अमिषा, कार्तिकी, आर्वी, समिक्षा, नेत्रा, हर्षा, हंसिका, रोहित, शुभम, रूग्वेद, श्रेय, श्रेयस यांची नोव्हेंबर २०२२मध्ये मलेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या खेळाडूंना राजू कोळी, गोपाळ म्हात्रे, राकेश म्हात्रे, सुलभा कोळी, अपर्णा मोकल, विघ्नेश कोळी, निकीता कोळी यांनी मार्गदर्शन केले. विजेत्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## टीम इंडियाचे भरगच्च वेळापत्रक

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने २०२२ ते २०२७ या कालावधीतील पुरुष क्रिकेट संघांचे वेळापत्रक जाहीर केले. १२ संघांच्या या वेळापत्रकात एकूण ७७७ आंतरराष्ट्रीय सामने खेळविण्यात येणार आहेत. त्यात १७३ कसोटी, २८१ वनडे व ३२३ ट्वेंटी-२० सामन्यांचा समावेश आहे. या वेळापत्रकानुसार भारतीय संघ १८ ऑगस्ट २०२२ ते फेब्रुवारी २०२७पर्यंत ४४ कसोटी, ६३ वन डे व ७६ ट्वेंटी-२० सामने खेळणार आहे.

भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात १९९२नंतर प्रथमच पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळवण्यात येणार आहे. २०२३-२५मध्ये ऑस्ट्रेलियात बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी चुरस असेल, तर २०२५-२७मध्ये भारतात ही मालिका खेळवण्यात येणार आहे.

आयसीसीने जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या पुढील दोन पर्वांचे वेळापत्रकही जाहीर केले आहेत. या स्पर्धेत अ‍ॅशेस, भारत-इंग्लंड कसोटी मालिका याचीही उत्सुकता आहे. या दोन्ही मालिकांमध्ये प्रत्येकी पाच सामने खेळवले जातील. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया व भारत हे अनुक्रमे २२, २१ व २० कसोटी सामने खेळणार आहेत.

याशिवाय भारतात होणारा वन डे वर्ल्डकप, वेस्ट इंडिज व अमेरिकेत २०२४मध्ये होणारा ट्वेंटी-२० वर्ल्डकप आणि २०२५मध्ये पाकिस्तानमध्ये होणारी चॅम्पियन ट्रॉफी या महत्त्वाच्या स्पर्धा आहेत.

२०२६मध्ये भारत-श्रीलंका संयुक्त विद्यमाने ट्वेंटी-२० वर्ल्डकपचे आयोजन करणार आहे, तर २०२७मध्ये दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे व नामिबिया येथे वन डे वर्ल्डकप होणार आहे.

## फुटबॉल विश्वचषक; सुनावणी पुढे ढकलली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय फुटबॉल महासंघाने (फिफा) अखिल भारतीय फुटबॉल महासंघावर (एआयएफएफ) निलंबनाची कारवाई केली आहे. यामुळे भारतात होणाऱ्या १७ वर्षांखालील महिला विश्वचषक स्पर्धेचे भवितव्य अधांतरी लटकले आहे. एआयएफएफ निवडणुकांचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहचलेले आहे. त्यावर बुधवारी (दि. १७) तोडगा निघाला नाही. सर्वोच्च न्यायालयाने याबाबतची सुनावणी २२ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलली आहे.

## लकी स्पोर्ट अ‍ॅकॅडमीचे मॅरेथॉनमध्ये यश

**उरण : रामप्रहर वृत्त**


उरण येथे झालेल्या जिल्हास्तरीय द्रोणागिरी मॅरेथॉनमध्ये लकी स्पोर्ट अ‍ॅकॅडमीच्या खेळाडूंनी यश प्राप्त केले आहे. त्यांचे कौतुक होत आहे.



१४ वर्षाखालील मुलांच्या गटामध्ये पाच किमी शर्यतीत सार्थक संजय पाटील (दिघोडे) प्रथम क्रमांक, मिहीर अनंत माळी (दिघोडे) तृतीय, १४ वर्षाखालील मुलींच्या तीन किमी शर्यतीत दिव्या महेंद्र ठाकूर (धुतूम) द्वितीय, १८ वर्षाखालील मुलींच्या पाच किमी शर्यतीत तनिष्का गंगाराम थळी द्वितीय (विंधणे), १८ वर्षाखालील मुलांच्या १० किमी शर्यतीत दीप अजित मोहिते (दादरपाडा) द्वितीय, यश कैलास पाटील (दिघोडे) पाचवा क्रमांक, महिलांच्या १० किमी शर्यतीत साक्षी कैलास पाटील (दिघोडे) चौथा क्रमांक व ईश्वरी मनोहर चिर्लेकर (विंधणे) हिने पाचवा क्रमांक प्राप्त केला.

याचबरोबर नवीन पनवेल येथे झालेल्या राज्यस्तरीय फ्रेंडशिप मॅरेथॉन व ऑल इंडिया आपले पुणे मॅरेथॉनमध्ये श्रेया प्रल्हाद पाटील (दिघोडे) हिने सुवर्णपदक, साक्षी कैलास पाटील व दिव्या महिंद्र ठाकूर यांनी रौप्यपदक पटकाविले. सर्व यशस्वी धावपटूंचे अभिनंदन होत आहे.

## क्रिकेटर शेन वॉर्नबाबत जीना स्टीवर्टचा खुलासा



**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा माजी फिरकीपटू शेन वॉर्नचे या वर्षाच्या सुरुवातीला निधन झाले. वॉर्नने थायलंडमध्ये अखेरचा श्वास घेतला. त्याच्या मृत्यूची बातमी कळताच संपूर्ण क्रिकेटविश्वात शोककळा पसरली. वॉर्नच्या मृत्यूनंतर काही महिन्यांनी एक खुलासा झाला आहे.

ऑस्ट्रेलियन सेलिब्रिटी जीना स्टीवर्टने दिग्गज क्रिकेटर शेन वॉर्नसोबत गुप्त संबंध असल्याचा खळबळजनक दावा केला आहे. स्टीवर्टने असेही म्हटले आहे की, वॉर्नच्या मृत्यूपूर्वी दोघे एकमेकांना डेट करीत होते आणि नियमित संपर्कात होते.

स्टीवर्टने डेली स्टारशी केलेल्या संभाषणात खुलासा केला की, गेल्या काही महिन्यांपासून मी उद्ध्वस्त झाले आहे. जगाने एक स्टार गमावला आहे आणि मी एक मित्र आणि विश्वासू गमावला आहे. आम्ही डेटिंग करीत होतो, पण कोणालाही माहीत नव्हते. मी त्याला क्रिकेटच्या सामन्यानंतर भेटायचे आणि संपूर्ण रात्र एकमेकांना जाणून घेण्यात आणि गप्पा मारण्यात घालवली. त्यानंतर आम्ही खूप जवळ आलो. शेनला या गोष्टी बाहेर पडू द्यायच्या नव्हत्या. म्हणून मला सर्वकाही गुप्त ठेवावे लागले.

## लीजेंड लीग क्रिकेटसाठी युवराज सिंग होतोय सज्ज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा माजी दिग्गज फलंदाज युवराज सिंग पुन्हा एकदा त्याच्या जुन्या अंदाजात समोर आला आहे. सिक्सर किंग म्हणून प्रसिद्ध असलेल्या युवराजने एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्याची खूप चर्चा रंगली आहे. तो फलंदाजी करीत असून त्याने आपल्या चाहत्यांना आपल्या जुन्या अंदाजाची झलक दाखवली आहे. ही तयारी आहे लीजेंड लीग क्रिकेटची.



व्हिडीओमध्ये युवराजने वॉरियर पुन्हा आल्याचे म्हटले आहे, तर कॅप्शनमध्ये लिहले आहे की, जे काही होणार आहे त्यासाठी खूप उत्सुक आहे, अशा आशयाचे कॅप्शन लिहून युवराजने सर्वांचे लक्ष वेधले. विशेष म्हणजे लवकरच लीजेंड लीग क्रिकेटमध्ये भारत विरुद्ध जग असा सामना होणार आहे. या लीगच्या दुसऱ्या पर्वाला सुरुवात होणार असून सहा शहरांमध्ये ही लीग खेळवली जाईल. लीगमधील इंडियन महाराजा व वर्ल्ड जायंट्स या दोन संघांतील खेळाडूंची नावे जाहीर करण्यात आली आहेत. तब्बल १० देशातील खेळाडू या लीगमध्ये सहभागी होणार आहेत. राहिलेल्या चार फ्रँचायझींची लवकरच घोषणा होण्याची शक्यता आहे. या हंगामात एकूण १५ सामने खेळवले जाणार आहे.

सौरव गांगुली यांच्या नेतृत्वात भारतीय संघ असणार आहे, तर इयॉन मॉर्गनकडे रेस्ट ऑफ वर्ल्डच्या संघाची धुरा सोपवण्यात आली आहे. लक्षणीय बाब म्हणजे या लीगमध्ये युवराज सिंगदेखील सहभागी होऊ शकतो अशी चर्चा आहे. युवराज हा भारतीय क्रिकेटमधील एक प्रमुख चेहरा राहिला आहे. भारताकडून टी-२० आंतरराष्ट्रीय नंबर ४वर सर्वाधिक धावा करणारा खेळाडू म्हणून त्याला ओळखले जाते.

## प्रसादचा फोटो पाहून चाहते चिंतेत

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारताचा माजी वेगवान गोलंदाज व्यंकटेश प्रसाद सोशल मीडियावर चांगला अ‍ॅक्टिव्ह असतो. त्याने भारताच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त हातात तिरंगा घेतलेला फोटो सोशल मीडियावर शेअर केला, मात्र हा फोटो पाहून त्याचे चाहते चिंतेत पडले. या फोटोत प्रसाद खूप बारीक झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे चाहते सोशल मीडियावर त्याच्या तब्येतीविषयी विचारणा करू लागले.



व्यंकटेश प्रसादने सोशल मीडियावर तिरंग्यासोबत आपला फोटो शेअर करीत सर्वांना स्वांतत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या होत्या. प्रसादने या फोटोला 'स्वातंत्र्य विचारांचे, शब्दांमधला विश्वास आणि आत्म्यात गर्व. स्वातंत्र्य दिनानिमित्त देशाला अभिवादन करा,' असे कॅप्शन दिले.

हा फोटो पाहिल्यानंतर चाहत्यांना व्यंकटेश प्रसाद खूप बारीक झाल्याचे जाणवले. त्यामुळे चाहत्यांनी त्याच्या तब्येतीविषयी विचारणा करण्यास सुरुवात केली. त्याला तब्येतीची काळजी घेण्याचेही आवाहन केले. दरम्यान, प्रसादने एका चाहत्याला उत्तर दिले.

प्रसाद म्हणाला, मी एकदम ठणठणीत आहे. दीर्घ काळासाठी मी साधना करीत होतो तसेच तिरूवंदमलई मे अरुणाचल पर्वतावर गिलीवलम (परिक्रमा) करीत होतो. मी लो डायटवर होते. त्यामुळे माझे वजन कमी झाले आहे, मात्र मला उर्जा मिळाल्यासारखे वाटते. काही काळातच माझे वजन पुन्हा वाढेल. आपुलकीने विचारणा केल्याबद्दल आभारी आहे.


## स्वातंत्र्य दिनानिमित्त पेणमध्ये जलतरणपटूंकडून परिक्रमा

**पेण : प्रतिनिधी**

येथील मामा वास्कर जलतरण तलाव हौशी जलतरणपटूंनी शहरातील कुंभार तलावात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ परिक्रमा मारून आगळावेगळा स्वातंत्र्य दिन साजरा केला. या उपक्रमात सहा महिला, तर १९ पुरुष अशा एकूण २५ जलतरणपटूंनी सहभाग घेतला. याबद्दल बोलताना पेण पालिकेचा जलतरण तलाव बांधण्याचा निर्णय सार्थकी ठरल्याचा अभिमान वाटत असल्याचे नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी म्हटले.

या उपक्रमात सहभागी झालेल्या जलतरणपटूंना शुभेच्छा देण्यासाठी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्यासह तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, उपनगराध्यक्ष वैशाली कडू, प्रादेशिक परिवहन अधिकारी जाधव, नगरसेविका सपना पाटील, संतोष शृंगारपुरे, माजी सभापती प्रकाश शिंगरुत, युवा नेते ललित पाटील, हितेश पाटील, माजी मुख्याध्यापिका कलावती पाटील, सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे, संजय पाटील, रामभाऊ गोरिवले, बाळा जितकर आदी उपस्थित होते.





(छाया : अनिस मनियार)

या वेळी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त हा आगळवेगळा उपक्रम राबवून तो यशस्वी केल्याबाबत सर्व जलतरणपटूंचे अभिनंदन करीत सांगितले की, शहरात मामा वास्कर जलतरण तलाव उभारण्याचा आम्ही घेतलेला निर्णय हा योग्य होता याचा आनंद वाटला. येथील जलतरपटू जिल्हा, राज्याबरोबर आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यश संपादन करून नावलौकिक मिळवत आहेत. ज्या तलावात हा उपक्रम राबविला गेला त्याच तलावात मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात येईल.

तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांनी या उपक्रमात पुरुषांसोबतच महिलांचादेखील सामावेश असल्याने आज येथे महिला-पुरुष समानता दिसून आली असून आपल्या पेण तालुक्यातील अनेक खेळाडू राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कसे पोहचतील यासाठी आपण सगळे मिळून प्रयत्न करूया, असे सांगितले.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशिक्षक सचिन शिंगरूत, अनिल कनघरे व हिमांशु मलबारी यांनी जलतरणपटूंना चांगल्या प्रकारे प्रशिक्षण दिले होते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com